सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १ ला ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# महापौरांचे आरक्षण सोडत गुरुवारी

## मंत्रालयात सुटणार आरक्षणाची सोडत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष 'शहराचा प्रथम नागरिक' कोण होणार, याकडे लागले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौरपदाच्या आरक्षणाची अधिकृत सोडत गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी मंत्रालयात काढली जाणार आहे.

नगर विकास विभागाच्या पत्रानुसार, ही सोडत राज्याच्या नगर विकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. मंत्रालयातील ६ व्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११.०० वाजल्यापासून या प्रक्रियेला सुरुवात होईल. या सोडतीद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती , इतर मागास प्रवर्ग आणि महिलांसाठीचे महापौरपद निश्चित केले जाणार आहे.

**दिग्गजांची धाकधूक वाढली**

मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहरांसह राज्यातील २९ महापालिकांमध्ये आरक्षणाची ही सोडत अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघते, यावरच अनेक राजकीय दिग्गजांचे महापौर होण्याचे स्वप्न अवलंबून आहे. जर एखाद्या पालिकेत खुल्या प्रवर्गाचे आरक्षण आले, तर चुरस अधिक वाढण्याची शक्यता आहे.या सोडतीसाठी नगर विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले असून, राज्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवांना या नियोजनाची माहिती देण्यात आली आहे. २२ जानेवारीच्या दुपारपर्यंत राज्यातील २९ शहरांच्या महापौरपदाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# मुंबईत महायुतीचाच महापौर होणार : देवेंद्र फडणवीस

## एकनाथ शिंदेंत फोनवरून चर्चा; मुख्यमंत्री दावोसवरून परतल्यानंतर सुटणार बीएमसीचा तिढा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

मुंबई महापालिका निवडणुकीत सत्ताधारी भाजप व शिंदे गटाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. पण महापौर कोणत्या पक्षाचा होणार? या मुद्यावरून दोन्ही पक्षांत जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. त्यातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरून संवाद साधल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे फडणवीस दावोस दौऱ्यावरून परतल्यानंतर मुंबईच्या महापौरपदाचा तिढा सुटणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मुंबई महापालिकेसाठी गत आठवड्यात निवडणूक झाली. त्यात भाजपला सर्वाधिक ८९ जागा मिळाल्या. तर शिंदे गटाला २९, ठाकरे गटाला ६५, तर काँग्रेस व मनसेला अनुक्रमे २४ व ६ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपला आपल्या मदतीशिवाय महापौर बनवणे अशक्य असल्याचे लक्षात येताच शिंदेंनी आपल्या नगरसेवकांना मुंबईतील पंचतारांकित हॉटेलात हलवले आहे. त्यानंतर त्यांनी भाजपपुढे अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवून दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शिंदेंच्या या डावपेचामुळे मुंबीचा महापौर कोण होणार? हा प्रश्न कळीचा बनला आहे. या पार्श्वभूमीवर सूत्रांनी देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंशी फोनवरून संवाद साधल्याचा दावा केला आहे.

**भाजप ठाकरे गटासोबत जाण्याच्या चर्चेत तथ्य नाही**



यासंबंधीच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोस दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथून फोनवरून एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद साधला. या चर्चेत दोन्ही नेत्यांनी दावोस दौऱ्यानंतर एकत्र बसून या मुद्यावर तोडगा काढण्याचा निर्णय घेतला. भाजप ठाकरे गटासोबत जाण्याच्या चर्चेत कोणतेही तथ्य नाही. याविषयी अफवांवर विश्वास ठेवण्याची काहीही गरज नाही. मुंबईकरांनी महायुतीवर दाखवलेल्या विश्वासाला तडा जाईल असे कृत्य कोणत्याही पक्षाकडून होणार नाही असे दोन्ही नेत्यांनी ठरवल्याची माहिती आहे.

या सूचक संवादामुळे फडणवीस परदेश दौऱ्यावरून मुंबईत परतल्यानंतर मुंबईच्या महापौरपदाचा तिढा निकाली निघण्याची शक्यता वाढली आहे. दुसरीकडे, राज्याच्या नगरविकास विभागाने महापौरपदाचे आरक्षण सोडवण्यासाठी गुरुवारी बैठक बोलावली आहे. तोपर्यंत भाजप – शिंदे गटाचा महापौरपदाचा वाद निकाली निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**सध्या कुठे आहेत शिंदेंचे मुंबईतील नगरसेवक?**

शिंदे गटाचे नवनिर्वाचित नगरसेवकांचा मुक्काम सध्या मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आहे. निवडणूक निकाल लागला तेव्हाचा या नगरसेवकांना इथे हलवण्यात आले आहे. नवीन नगरसेवकांपैकी कुणीही भाजप किंवा ठाकरे गटाशी संपर्क साधू नये यासाठी खबरदारी म्हणून शिंदे गटाकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे. विशेषतः भाजपला शिंदे गटाच्या मदतीशिवाय मुंबईत आपला महापौर करता येणे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे शिंदेंनी आपल्या नगरसेवकांच्या पाठिंब्याच्या मोबदल्यात भाजपपुढे अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवल्याचीही माहिती आहे.

# शिवसेना आणि धनुष्यबाण कुणाचा? सर्वोच्च न्यायालयात बुधवारी अंतिम सुनावणी

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ'बाबतही होणार फैसला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**




महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा आणि दोन महत्त्वाच्या प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याचा पेच आता सर्वोच्च न्यायालयात सुटण्याच्या मार्गावर आहे. शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाबाबत येत्या बुधवारपासून (२१ जानेवारी) अंतिम सुनावणीला सुरुवात होत आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस या प्रकरणाचा युक्तिवाद ऐकून घेणार असून, राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल लवकरच जाहीर होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हावर देखील सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे.

विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात उघड बंड केले होते. त्यांनी आपल्या समर्थक आमदारांसह प्रथम गुजरात व तेथून गुवाहाटीला प्रयान केले होते. शिंदे यांनी नंतर आपल्या समर्थक आमदार व खासदारांच्या संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्हावर दावा सांगितला होता. त्यासंबंधीचा कायदेशीर लढा केंद्रीय निवडणूक आयोगापुढे झाला. त्यात आयोगाने संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्ह हे उद्धव ठाकरे यांच्याकडून काढून शिंदे यांच्या गटाला दिले.

या निर्णयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. यासोबतच, शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्याऐवजी पात्र ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयालाही शिवसेनेचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांनी आव्हान दिले असून, या दोन्ही याचिकांवर आता बुधवारी एकत्र सुनावणी होणार आहे.

**सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद**

याप्रकरणी नोव्हेंबरमध्ये मागील सुनावणी झाली होती. त्या सुनावणीवेळीच सर्वोच्च न्यायालयाने अंतिम सुनावणीची तारीख निश्चित करत, प्रकरणाचा निकाल लवकरच दिला जाईल, असे संकेत दिले होते.

# मुंबईत बिहारच्या नितीश सरकारचा मास्टरस्ट्रोक

## ३० मजली 'बिहार भवन' उभारून आर्थिक राजधानीत ताकद वाढवणार; ३१४.२० कोटी रुपयांचा खर्च

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**



देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आता बिहार सरकारची ठळक आणि भक्कम उपस्थिती दिसणार आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहार सरकारने मुंबईत अत्याधुनिक आणि भव्य 'बिहार भवन' उभारण्याचा निर्णय घेतला असून, हा प्रकल्प केवळ एक इमारत नसून बिहारच्या प्रशासकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीचा नवा अध्याय ठरणार आहे. मुंबईत वास्तव्यास असलेल्या लाखो बिहारवासीयांसाठी हे भवन एक महत्त्वाचे आधारकेंद्र ठरणार असल्याचं मानलं जात आहे.


प्रस्तावित बिहार भवन हे ३० मजली असणार असून, बेसमेंटसह इमारतीची एकूण उंची सुमारे ६९ मीटर इतकी असेल. ही इमारत अत्याधुनिक वास्तूशैलीत उभारली जाणार असून, आधुनिक शहरी नियोजन आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात आधुनिकतेसोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून केला जाणार आहे.

या भव्य इमारतीत सौर पॅनेल बसवण्यात येणार असून, ऊर्जेच्या गरजांसाठी नवीकरणीय स्रोतांचा वापर करण्यात येईल. पाण्याच्या पुनर्वापरासाठी अत्याधुनिक एसटीपी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. याशिवाय, इमारतीभोवती हिरवळीचे क्षेत्र विकसित करण्यात येणार असून, हा प्रकल्प 'ग्रीन बिल्डिंग' संकल्पनेनुसार उभारला जाणार आहे. त्यामुळे पर्यावरणीय जबाबदारी जपत आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा बिहार सरकारचा उद्देश स्पष्ट दिसतो.

दिल्लीतील बिहार भवनाच्या धर्तीवरच मुंबईतील हे भवन देखील सर्व सुविधांनी सुसज्ज असणार आहे. या इमारतीत बिहार सरकारच्या विविध विभागांची कार्यालये, प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र विभाग, तसेच बैठका आणि कार्यक्रमांसाठी ७२ आसनांची अत्याधुनिक सभागृहे असतील. याशिवाय, अधिकाऱ्यांसाठी आणि पाहुण्यांसाठी आधुनिक पार्किंग व्यवस्थाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मुंबईत येणाऱ्या बिहार सरकारच्या अधिकाऱ्यांना तसेच राज्याशी संबंधित कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठी सोय होणार आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अखत्यारितील एलफिंस्टन एस्टेट परिसरात उभारला जाणार आहे. यासाठी सुमारे ०.६८ एकर म्हणजेच २९५२.७७ चौरस मीटर एवढं क्षेत्रफळ निश्चित करण्यात आलं आहे. इतक्या मोक्याच्या ठिकाणी बिहार भवन उभारल्यामुळे मुंबईतील प्रशासकीय आणि आर्थिक केंद्रांशी बिहार सरकारचा थेट संपर्क अधिक सुलभ होणार आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे ३१४.२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, हा खर्च बिहार सरकारकडून करण्यात येणार आहे.

# विदर्भाने रचला इतिहास ! पहिल्यांदाच पटकावला विजय हजारे करंडक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

अथर्व तायडेच्या शानदार शतकापाठोपाठ यश ठाकूर आणि नचिकेत भुते यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर विदर्भ संघाने रविवारी इतिहास रचला. अंतिम सामन्यात बलाढ्य सौराष्ट्रचा ३८ धावांनी पराभव करत विदर्भाने पहिल्यांदाच प्रतिष्ठित विजय हजारे करंडक (एकदिवसीय स्पर्धा) आपल्या नावावर केला.

बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स मैदानावर रंगलेल्या या अंतिम सामन्यात सौराष्ट्रने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. विदर्भाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकांत ८ बाद ३१७धावांचा डोंगर उभारला. या आव्हानाचा पाठलाग करताना सौराष्ट्रचा डाव ४८.५ षटकांत २७९ धावांत संपुष्टात आला.

प्रथम फलंदाजीचे निमंत्रण मिळाल्यानंतर विदर्भाची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर अथर्व तायडेने ११८ चेंडूंत १५ चौकार आणि ३ षटकारांच्या आतषबाजीसह १२८ धावांची खेळी केली. शानदार फॉर्ममध्ये असलेला अमन मोखाडे (३३ धावा) बाद झाल्यानंतर, अथर्वने यश राठोडसोबत डावाची सूत्रे हाती घेतली. यश राठोडने ६१ चेंडूंत २ चौकार आणि २ षटकारांसह ५४ धावांचे योगदान दिले. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी १३३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचत विदर्भाला भक्कम स्थितीत आणले.मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना सौराष्ट्रचे फलंदाज विदर्भाच्या गोलंदाजीसमोर अडखळले. प्रेरक मंकडने ९२ चेंडूंत १० चौकारांसह ८८ धावांची खेळी करत झुंज दिली. विदर्भाकडून यश ठाकूरने सर्वाधिक ४ बळी टिपले. नचिकेत भुतेने ३ बळी घेत त्याला सुरेख साथ दिली.

# दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीत मिठाचा खडा? एकत्र यायचे असेल तर सत्तेतून बाहेर पडा

## शरद पवारांच्या नेत्याचा उपमुख्यमंत्री अजित पवारांना सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादीची युती होण्याची शक्यता असताना शरद पवार गटाच्या आमदार उत्तम जानकर यांनी युतीसाठी अजित पवारांपुढे सत्तेतून बाहेर पडण्याची अट ठेवली आहे. यामुळे दोन्ही पक्षांच्यात संभाव्य युतीत मिठाचा खडा पडल्याची चर्चा सुरू झाली आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत शरद पवार व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली होती. पण त्यानंतरही त्यांना दारूण पराभव झाला होता. आता पवार कुटुंब जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतही एकत्र येण्याची शक्यता आहे. त्यासंबंधीची बोलणी त्यांच्या नेतृत्वांत सुरू झाली आहे. पण शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी अजित पवारांपुढे युतीसाठी महायुती सरकारमधून बाहेर पडण्याची अट ठेवल्यामुळे दोन्ही पक्षांची अडचण झाली आहे. उत्तम जानकर म्हणाले, महापालिका निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा आहे. पण मला याची कोणतीही कल्पना नाही.



**बिर्याणीत गुळवणी चालेल का?**

ते पुढे म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील असे मला वाटत नाही. कारण, शरद पवारांचा विचार वेगळा आहे आणि आता अजित पवार हे सत्तेसोबत आहेत. त्यामुळे बिर्याणीमध्ये गुळवणी चालेल की नाही? हे मला माहिती नाही. अजित पवारांना कोणता तरी एक निर्णय घ्यावा लागेल. उद्या काय घडेल हे मला माहिती नाही. पण शरद पवारांचा वेगळा विचार आहे. तो घेऊन आम्ही पुढे जात आहोत. त्यामुळे अजित पवारांना एकत्र यायचे असेल तर प्रथम त्यांना सत्तेतून बाहेर पडावे लागेल. त्यांना शरद पवारांच्या विचाराने पुढे जावे लागेल. काही तरी धोरण असल्याशिवाय कोणताही पक्ष चालत नाही. त्यासाठी विचार असावा लागतो. मग कोणताही पक्ष असू द्या.

भाजपचाही हिदुत्त्वाचा विचार आहे. शिवसेनेचाही हिंदुत्त्वाचा विचार आहे. तसे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा विचार पुरोगामीत्वाचा आहे. त्यामुळे काही तरी धोरण व भविष्य ठरवावे लागते, असे उत्तम जानकर म्हणाले.

**अजित पवारच अंतिम निर्णय घेतील**

दुसरीकडे, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते तथा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावर सूचक विधान केले आहे. ते म्हणाले, आमच्याच पक्षाची नव्हे तर कोणत्याही पक्षांची आघाडी असली तरी चिन्ह हे एकच असले पाहिजे. जिल्हा परिषदेच्या निवडणुका दोन्ही राष्ट्रवादी मिळून लढण्याच्या मुद्यावर आमचे पक्षाध्यक्ष अजित पवार योग्य तो निर्णय घेतील. निवडणुकीत ग्रामीण भागातील अनेक लोकांचा मतदान करताना चिन्हावरून गोंधळ उडतो. त्यामुळे चिन्ह एकच असले पाहिजे. तूर्त दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवण्यासंबंधीचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अजित पवारांचा आहे, असे ते म्हणालेत.

# महापालिका निवडणुकांत अपेक्षित यश न मिळाल्याने उपमुख्यमंत्री शिंदे नाराज

## अकार्यक्षम मंत्री,पदाधिकारी यांना देणार डच्चू?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राज्यातील २९ जिल्ह्यांतील नगरपालिका निवडणुकांत अपेक्षित निकाल न लागल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता 'भाकरी फिरवण्याची' तयारी सुरू केल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून कळते. विशेष म्हणजे या निवडणुकांमध्ये पक्षातील मंत्री आणि आमदारांची कामगिरी समाधानकारक नसल्यामुळे शिंदे प्रचंड नाराज असल्याची माहिती समोर येत आहे.



अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीची जबाबदारी मंत्री संजय राठोड,माजीपालकमंत्री जगदीश गुप्ता, व कॅप्टन अभिजित अडसूळ,प्रीती बंड यांच्या कडे देण्यात अली होती मात्र त्यांनी भाजपा सोबत युती केली ना मनपा मध्ये आपले नगरसेवक निवडून आणू शकले नाहीत संपूर्ण प्रचारादरम्यान त्यांनी पाहिजे त्या प्रमाणात बेठका ,कॉर्नर सभा घेतल्या नाहीत त्यामुळे शिंदे प्रचंड नाराज असल्याची माहिती आहे. आज अमरावती महापालिकेत शिंदे सेनेच्या पाच ते सात जागा असत्या तर चित्र वेगळे राहू शकले असते हे विशेष.

त्यामुळेच पक्षासाठी अपेक्षित निकाल न देऊ शकलेल्या आणि संघटनात्मक पातळीवर अपयशी ठरलेल्या मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू देण्याची शक्यता बळावली आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, पालिका निवडणुकांपूर्वीच एकनाथ शिंदे यांनी पक्षातील मंत्र्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला होता. जिल्हा परिषद, नगरपालिका आणि नगराध्यक्षपदाच्या निवडणुका या पक्षातील मंत्र्यांसाठी 'लिटमस टेस्ट' असतील, असे संकेत त्यांनी दिले होते. त्यामुळे या निवडणुकांच्या निकालांवरून मंत्र्यांची कामगिरी तपासली जाणार, हे जवळपास निश्चित होते.

आता या निवडणुकांमध्ये अपेक्षित कामगिरी न करणाऱ्या मंत्र्यांकडील जबाबदाऱ्या काढून घेऊन नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा शिंदे यांचा विचार असल्याचे बोलले जात आहे. पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी आणि संघटन बळकट करण्यासाठी मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्हा परिषद, नगरपालिका आणि नगराध्यक्षपदाच्या निवडणुकांमध्ये पक्ष काही ठिकाणी दुसऱ्या क्रमांकावर राहिला असला, तरीही नेतृत्वाकडून अपेक्षित कामगिरी झाली नसल्याची भावना पक्षश्रेष्ठींमध्ये आहे. त्यामुळे येत्या काळात मंत्रिमंडळातून नेमका कोणाला डच्चू मिळतो आणि कुणाच्या गळ्यात मंत्रीपदाची माळ पडते, याकडे राज्याचे राजकीय वर्तुळ उत्सुकतेने पाहत आहे.

## संपादकीय ......

# भाजपच्या विजयाची महात्सुनामी!

*मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांचा निकाल काल शुक्रवारी हाती आला. या निकालांमध्ये भाजपप्रणित महायुतीने २० हून अधिक महापालिकांवर एकहाती सत्ता मिळवत विधानसभेपाठोपाठ विजयाचा झंझावात इथेही कायम ठेवला आहे. नगरपरिषदा-पंचायत समिती निवडणुकांप्रमाणेच या निवडणुकांतही प्रामुख्याने सत्ताधारी महायुतीतील भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने एकमेकांचे हात पकडण्याऐवजी एकमेकांच्या गळ्यात तंगड्या टाकणे पसंत केले होते. हेच यंदाच्या महापालिका निवडणुकीचे वैशिष्ट्य ठरले. मुंबईत भाजप-शिंदे गट विरुद्ध ठाकरे गट, वसई-विरारमध्ये भाजप विरुद्ध बहुजन विकास आघाडी, भिवंडी-निजामपूरमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, परभणीमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस, तर लातूरमध्ये काँग्रेस-वंचित विरुद्ध भाजप अशा महापालिकांमध्ये सत्ताधारी विरुद्ध विरोधी पक्षात सरळ लढती बघायला मिळाल्या. या लढतींचा अपवाद वगळल्यास इतर महापालिकांमध्ये विरोधी पक्षांना बाजूला सारून सत्ताधारी पक्षातल्या तिन्ही घटक पक्षांनीच एकमेकांना तगडे आव्हान दिले. त्यातही महाराष्ट्रातील सगळ्या लढती एका बाजूला आणि मुंबई महापालिकेची लढत दुसर्या बाजूला एवढी हवा एकट्या मुंबई महापलिका निवडणुकीने तयार केली होती. मागच्या ३० वर्षांपासून मुंबई महापालिकेवर भाजपच्या साथीने शिवसेनेचा भगवा फडकत होता. २०१४ नंतर राज्यातल्या सत्तेत भलेही भाजप मोठा भाऊ बनला असला, तरी मुंबई महापालिकेच्या ७२ हजार कोटी रुपयांच्या तिजोरीच्या चाव्या शिवसेनेच्याच हाती होत्या. २०१७ च्या निवडणुकीत भाजप आणि तत्कालीन एकसंध शिवसेना वेगवेगळे लढले होते. भाजपने ही लढत बरोबरीत सोडवून मुंबईतल्या वाढत्या ताकदीची बेंडकुळी शिवसेनेला तेव्हाच फुगवून दाखवली होती. मात्र, चुलत भावाच्या मनसेचे काही नगरसेवक फोडून संख्याबळ वाढवत उद्धव ठाकरेंनी कसेबसे महापौरपद राखले होते. तेव्हापासून भाजप मुंबई महापालिका ताब्यात घेण्यासाठी जंगजंग पछाडत होता.*

*२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर बदललेल्या सत्ता समीकरणांनी खुर्ची बुडाखाली घेण्यासाठी पारंपरिक युत्या-आघाड्यांच्या, जनतेच्या आशा-आकांक्षांच्या राख रांगोळ्या केल्या. याच काळात मविआचे मुख्यमंत्री म्हणून विराजमान झालेल्या उद्धव ठाकरेंना राज्यात तर सोडाच परंतु, पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या मुंबई-ठाण्यातही पक्षाला ना रसद पुरवठा करता आला, ना पक्षाला बळकटी देता आली. एकनाथ शिंदेंच्या फुटीचा मोठा दणकाही उद्धव ठाकरे गटाला मुंबई महानगरात बसला. त्सुनामीच्या लाटेसारखे नेते, पदाधिकारी एवढेच नाही तर कधीकाळी निष्ठावंत म्हणवले जाणारे कार्यकर्तेही शिंदे-भाजपच्या वळचणीला गेले. दरम्यानच्या काळात राष्ट्रवादीचीही दोन शकले झाली, काँग्रेसची होती नव्हती शक्ती क्षीण झाली. लोकसभा-विधानसभेतील चढउतारानंतर मराठी भाषेच्या मुद्द्यावर उद्धव आणि राज ठाकरेंना एकमेकांच्या गळ्यात गळा घालण्याची उपरती झाली. आपसातील वादविवाद, रुसवे-फुगवे मागे सोडून उद्धव आणि राज ठाकरेंनी कौटुंबिक संबंध सुधारले. राजकीय व्यासपीठावर दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने मराठी माणसाच्या मनातली युती साध्य झाली, ठाकरे बंधूंच्या प्रेमात असणार्यांना आकाश ठेंगणे वाटू लागले. हे खरे, परंतु मागच्या २० वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याचे दोघेही विसरले. सतत भूमिका बदलणार्या राज ठाकरेंच्या मनसेची मुंबईतली ताकद या निवडणुकीत दिसून आली. लोकसभेला मुस्लीम, अल्पसंख्याक परप्रांतीय मतांची ताकद देणारा काँग्रेसचा हात उद्धव ठाकरेंच्या पाठीमागून निसटला. ठाकरे बंधूंनी मराठी माणसाला दिलेली भावनिक साद भाजपच्या चोख रणनीतीपुढे तोकडी पडली. ठाकरे ब्रँड, मुंबईला तोडण्याचा डाव, शिवाजी पार्कवरील अदानींच्या नावे उभा केलेला व्यापारी भस्मासूरही तमाम मराठी मते एकवटण्यात असमर्थ ठरला. याउलट मेट्रोचे जाळे, सिमेंट-काँक्रिटचे रस्ते, उड्डाणपूल, बिझनेस हब, पायाभूत सुविधांचे चित्र भाजपने तरुण मतदार, निओ मिडलक्लास अर्थात नव मध्यमवर्गाच्या मनात योग्यपणे बिंबवले. भलेही राज ठाकरेंच्या शिवाजी पार्कवरील सभेपुढे भाजप-शिवसेनेची सभा फिकी पडली, तरी महायुतीने आधीच जिल्ह्याजिल्ह्यात जावून विकासाचे नॅरेटिव्ह सेट केले होते.*

*प्रचाराच्या रणधुमाळीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार एवढेच नाही, तर काँग्रेसचे नेते तीस-तीस, चाळीस-चाळीस सभा घेऊन उभा महाराष्ट्र पिंजून काढत असताना ठाकरे बंधूंनी ३-४ सभांवर आटोपते घेतले. महायुतीतल्या प्रमुख नेत्यांनी नगर परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकाही हलक्याने घेतल्या नाहीत. वेगवेगळे जिल्हे असोत, तालुके असोत किंवा गावस्तरावर जात मतदारांशी वन टू वन कनेक्ट करण्याला महत्त्वाचे मानले. मागच्या दोन-तीन वर्षांत विविध योजना, सवलती, घोषणांचा पाऊस पाडला. विरोधकांना फोडत, माणसे खेचत विकासाचे राजकारण जराही थांबू दिले नाही. याउलट केवळ निवडणूक आयोगावर खापर फोडत निवडणुकीचे भवितव्य मराठी माणसांच्या हाती सोपवून मोकळे झालेले ठाकरे बंधू या लढाईत भाजपपुढे कुठेही टिकाव धरू शकले नाहीत. कधी नव्हे ते एमआयएमसारखा पक्ष मुंबईत ६ जागा मिळवतो. काँग्रेसच्या खात्यात १५ हून अधिक जागा पडतात, पण मनसेला साधा दुहेरी आकडाही गाठता येत नाही, हे अपयश ठाकरे बंधूंच्या रणनीतीतील चूक दाखवून देते. आतापर्यंत ठाकरेंच्या हाती असलेल्या मुंबई महापालिकेच्या चाव्या खेचून घेत आपल्या कमरेला खोचण्याचे काम भाजपने एकनाथ शिंदेंना हाताशी घेत मोठ्या दिमाखात केले आहे. शिवसेना पक्षप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षात शिवसेनेच्या हातून मुंबईची सत्ता जाणे यापेक्षा मोठी नामुष्कीची बाब असू शकत नाही. वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस चोवीस तास निवडणुकीच्या मोडमध्ये राहून भाजपने महायुतीसह हे यश खेचून आणले आहे. हे यश खेचताना भाजपने नाशिकमध्ये शिंदे गट-अजित पवार गटाच्या आघाडीलाही धूळ चारली, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत अजित पवार-शरद पवारांच्या आघाडीला नमवून पवार कुटुंबाचा चिरेबंदी वाडा उद्ध्वस्त करून घटकपक्षांमध्ये आपणच मोठा भाऊ असल्याचे दाखवून दिले आहे. वसई-विरारमध्ये बविआ, परभणी, काँग्रेस-ठाकरे गट, लातूर, चंद्रपूर, भिवंडीमध्ये काँग्रेस आणि मालेगावमध्ये एमआयएमचा अपवाद वगळता राज्यांतील इतर सर्व महापालिकांमध्ये भाजपचीच लाट दिसून येत आहे. या लाटेपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहांशिवाय लढणारे भाजपचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निवडणुकीत केलेल्या अहोरात्र मेहनतीचाच हा परिपाक आहे.*

# राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जाची होणार पुनर्रचना; १७ लाख शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने घेतला निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महाराष्ट्रातील १७.२९ लाख शेतकऱ्यांच्या २६,६५८.७७ कोटी रुपयांच्या थकीत कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी केंद्र सरकारने खाती निश्चित केली आहेत. सदस्य बँकांनी यासंदर्भात महाराष्ट्र राज्यस्तरीय बँकर्स समितीला (एसएलबीसी) आधीच माहिती दिली आहे.

सुधारित व्याज सवलत योजनेंतर्गत या वर्षासाठी लागू होणारा सवलतीचा व्याज दर बँकांना पुनर्रचित कर्जाच्या रकमेवर पहिल्या वर्षासाठी उपलब्ध करून दिला जाईल.




अशा पुनर्रचित कर्जावर दुसऱ्या वर्षापासून सामान्य व्याजदर लागू होईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील शेतकरी अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे झालेल्या मोठ्या प्रमाणावरील पीक नुकसानीमुळे आर्थिक संकटाचा सामना करत आहेत, ही बाब अनेक खासदारांनी केंद्राच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर केंद्राकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र सरकारने हेदेखील स्पष्ट केले आहे की, बँका बाधित शेतकऱ्यांवर कर्ज परतफेडीसाठी दबाव आणत नाहीत.

**दिलासा नेमका कसा?**

बाधित शेतकऱ्यांकडील कर्जवसुली स्थगित करण्यात आली आहे.

कर्जफेडीसाठी बँकांचा दबाव नाही मानसिक व आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न

पहिल्या वर्षी: पुनर्रचित कर्जावर व्याज सवलत मिळणार आहे. दुसऱ्या वर्षापासून : सामान्य व्याजदर लागू होतील. यामुळे दिलासा मिळेल.

२६ नोव्हेंबरचे पत्र; राज्यात नैसर्गिक आपत्ती जाहीर

अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी बँकांकडून कोणताही दबाव टाकला जात नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. ही माहिती महाराष्ट्र एसएलबीसीच्या अहवालाच्या आधारे देण्यात आली आहे. यासंदर्भात, महाराष्ट्र एसएलबीसीने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र शासनाने २६ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या पत्राद्वारे राज्यात नैसर्गिक आपत्ती जाहीर केली आहे.

तसेच एसएलबीसीने राज्यातील बँकांना नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या भागांमधील मदत उपायांसंबंधी आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचा सल्ला दिला आहे.राज्य सरकारचे नैसर्गिक आपत्ती जाहीर करण्याबाबतचे पत्र मिळाल्यानंतर, महाराष्ट्र एसएलबीसीने सर्व सदस्य बँकांना आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पात्र पीक कर्जाची पुनर्रचना करण्यास आणि पूरबाधित शेतकऱ्यांकडून कर्जवसुली स्थगित करण्यास कळवले आहे.

# विविध आजारांपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी खायला हवा हा पदार्थ



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्यातील कमी जास्त तापमानामुळे आजाराचा धोका अधिक असतो. या दिवसात सर्दी-खोकला वारंवार होतो. अशावेळी विविध संसर्गापासून




शरीराला दूर ठेवण्यासाठी विविध पोषकतत्वे शरीरात जाणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते थंडीच्या दिवसात शरीराला आतून उष्ण ठेवणाऱ्या पदार्थांचे सेवन करणे फायद्याचे ठरते. जसे की, तीळ, तूप असे पदार्थ. तूपात अनेक पोषक तत्त्वे असतात. यात ओमेगा-३, ओमेगा-९, फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन ए, के, ई यांचा समावेश असतो. आज आपण तूपाचे सेवन का आणि कसे करावे जाणून घेऊयात.

थंडीत तूप खाल्ल्याने शरीर आतून गरम राहते, ज्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते. रोगप्रतिकारकशक्ती मजबूत राहिल्याने विविध आजारांपासून शरीराचे संरक्षण होते.

सर्दी-खोकल्याच्या समस्येपासून दूर राहायचे असेल तर या दिवसात आवर्जून तूपाचे सेवन करावे.

तूप शरीरातील हाडांना बळकटी देण्याचे काम करते. ज्या लोकांना हिवाळ्यात चालण्याफिरण्यास त्रास होतो अशांनी तूपाचे सेवन अवश्य करावे. हाडांच्या आरोग्यासाठी तूप सर्वोत्तम आहे.

तूपाच्या सेवनाने पोटासंबंधित समस्या दूर होतात. यामुळे बद्धकोष्ठता, ॲसिडीची समस्या उद्भवत नाही. त्यामुळे हिवाळ्यातील डाएटमध्ये तूपाचा समावेश अवश्य करावा.

तूप खाल्ल्याने चेहऱ्याची चमक वाढते. त्यामुळे हिवाळ्यातील कोरड्या त्वचेपासून मुक्ती मिळण्यासाठी तूप खावे.

त्वचेप्रमाणे केसांच्या आरोग्यासाठी तूप अवश्य खायला हवे. केस गळणे, कोरडे होणे यावर तूप रामबाण उपाय आहे.

तूप कसे खाल?

थंडीत तूप गरम चपातीवर लावून खाता येईल. मात्र त्याचे अत्याधिक प्रमाणात सेवन करणे टाळावे.

भाजी बनवण्यासाठी रिफाइंड ऑइल ऐवजी तूपाचा वापर करावा.

भाज्या तुम्ही स्टर फ्राय करून सेवन करू शकता.

डाळीला तडका देण्यासाठी तूपाचा वापर करू शकता.

कोणत्याही स्पेशल फूडवेळी बटर ऐवजी तूपाचा वापर करता येईल पॉपकॉर्न, ओटमील, पॅनकेक तयार करताना तूपाचा वापर करणे फायद्याचे ठरेल.

# साडेतीन लाखांचा मिनी ट्रॅक्टर घ्या

## ९० टक्के अनुदान मिळवा, अशी आहे अर्जप्रक्रिया

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी राज्य शासनाकडून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर आणि त्याची उपसाधने पुरविण्याची विशेष योजना राबविली जात आहे.

त्यासाठी ३.५० लाखांपर्यंत खर्चास मान्यता आहे. त्यापैकी ९० टक्के म्हणजे ३.१५ लाख रुपये अनुदान दिले जाणार असून, उर्वरित १० टक्के रक्कम स्वयंसहायता बचत गटाला स्वहिस्सा म्हणून भरावी लागेल. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थी बचत गटांच्या बँक खात्यात रोख स्वरूपात जमा केली जाईल. समाज कल्याणच्या मिनी ट्रॅक्टर योजनेंतर्गत लाभार्थी गटांना शासनाने निश्चित केलेल्या मान्यताप्राप्त उत्पादकाकडूनच ट्रॅक्टर व उपसाधने खरेदी करावी लागणार आहेत. या प्रक्रियेंतर्गत जिल्ह्याला अपेक्षित उद्दिष्टापेक्षा जास्त अर्ज आले, तर लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड केली जाईल. यापूर्वी पॉवर टिलर किंवा मिनी ट्रॅक्टरचा लाभ घेतलेल्या गटांना या योजनेचा पुन्हा लाभ मिळणार नाही.

**अर्ज कोठे कराल ?**

संबंधित जिल्ह्याच्या सामाजिक न्याय भवनात समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल. या योजनेसाठी इच्छुक बचत गटांना ३० जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करावा लागणार असून, अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाने केले आहे.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे!** स्वयंसहायता बचत गट नोंदणी प्रमाणपत्र, बचत गटातील




सदस्यांची यादी, सर्व सदस्यांचे जातीचे प्रमाणपत्र, सर्व सदस्यांचे अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र, राष्ट्रीयीकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत लागते.

**अटी व पात्रता :**बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील असणे आवश्यक, गटाचे अध्यक्ष व सचिव अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील असावेत. सर्व सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. शासन मान्यताप्राप्त उत्पादकाकडूनच मिनी ट्रॅक्टर व उपसाथने खरेदी करणे बंधनकारक.

# १२६ शाळांना 'आरटीई' प्रवेशातून सूट

## शाळा नोंदणी प्रक्रिया संथगतीने२२६ शाळांपैकी अवघ्या ३७ शाळांचीच नोंदणी, १९ जानेवारीपर्यंत डेडलाइन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती :** १८शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, या प्रक्रियेतील पहिला टप्पा असलेली शाळा नोंदणी व पडताळणी संथगतीने सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्यातील पात्र २२६ शाळांपैकी अवघ्या आठ दिवसांत केवळ ३७ शाळांनीच नोंदणी पूर्ण केली असून उर्वरित शाळांची नोंदणी अद्याप प्रलंबित आहे. ही प्रक्रिया १९ जानेवारीपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने प्रशासनासमोर आव्हान निर्माण झाले आहे.दरवर्षी जिल्हास्तरावर आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. यंदा ही प्रक्रिया वेळेत सुरू करण्यात आली असून मागील वर्षी झालेल्या गोंधळातून धडा घेत प्रशासनाने यावेळी सुरुवातीपासूनच नियोजन केले आहे. आरटीई प्रवेश प्रक्रियेचा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे शाळा नोंदणी व त्यानंतर पडताळणी. या टप्प्यावरच पुढील प्रवेश प्रक्रियेची दिशा ठरत असल्याने नोंदणी



वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे.जिल्ह्यात एकूण ३५२ शाळा आहेत. यापैकी अल्पसंख्याक शाळा तसेच काही विशिष्ट निकष पूर्ण करणाऱ्या शाळांना आरटीई प्रवेश प्रक्रियेतून सूट दिली जाते. यंदा तब्बल १२६ शाळांना आरटीई २५ टक्के प्रवेशातून सूट देण्यात आली आहे. परिणामी, उर्वरित २२६ शाळांमध्येच आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश दिला जाणार आहे. मात्र, प्रत्यक्षात या २२६ शाळांपैकी फक्त ३७ शाळांनीच आतापर्यंत नोंदणी पूर्ण केल्याने ही संख्या चिंताजनक मानली जात आहे.गुरुवार, १५ जानेवारीपर्यंत नोंदणी प्रक्रियेचे आठ दिवस पूर्ण झाले असतानाही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने शालेय शिक्षण विभागाची चिंता वाढली आहे. नोंदणीसाठी आता केवळ तीन ते चार दिवस शिल्लक राहिले आहेत. या कालावधीत उर्वरित सर्व शाळांची नोंदणी पूर्ण होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे शाळा नोंदणी व पडताळणी प्रक्रियेस मुदतवाढ देण्याची शक्यता वर्तविली जात आहे.दरम्यान, पडताळणी प्रक्रियेदरम्यान काही बाबींवर विशेष लक्ष देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरित झालेल्या शाळांचा आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत समावेश होणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. कोणतीही अपात्र शाळा या प्रक्रियेत सहभागी होऊ नये, यासाठी पडताळणी काटेकोरपणे करण्यावर भर दिला जात आहे.आरटीई प्रवेश प्रक्रियेचा पुढील टप्पा पालक अर्ज, लॉटरी पद्धतीने प्रवेश आणि अंतिम प्रवेश असा असतो. मात्र, शाळा नोंदणीच वेळेत पूर्ण न झाल्यास संपूर्ण वेळापत्रक कोलमडण्याची शक्यता आहे. त्यामुळे उर्वरित शाळांनी तातडीने नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात येत असून, गरज भासल्यास मुदतवाढीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, असे संकेत देण्यात येत आहेत.

# सदाचारासाठी गुरूंचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे - जितेंद्रनाथ महाराज

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये महापारायण सोहळ्याची सांगता व पुस्तक प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** मनुष्य जन्म एकदाच मिळतो आणि तो सत्कार्यासाठी उपयोगात यावा. मात्र योग्य दिशा व संस्कार न मिळाल्यास जीवन भरकटते. जीवनाला योग्य वळण देण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांच्या मार्गदर्शनातून जीवनात आमूलाग्र बदल घडू शकतो, असे प्रतिपादन श्री देवनाथ पीठाधीश्वर परमपूज्य आचार्य श्री जितेंद्रनाथ महाराज यांनी केले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे आयोजित




श्री संत गजानन महाराज महापारायण सोहळ्याच्या समारोपीय (सांगता) समारंभात ते बोलत होते. यावेळी त्यांनी अध्यात्म, सदाचार, संस्कार व जीवनातील योग्य मार्ग यांचे महत्त्व उपस्थित भाविकांना समजावून सांगितले.या प्रसंगी महाराजांच्या शुभहस्ते संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील, सौ अनुराधाताई पोटे पाटील, श्रेयशदादा पोटे पाटील, ड. प्रविण मोहोड, मुखोद्गत वाचक सौ विद्याताई पडवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा प्रकाशित, श्री गजानन विजय ग्रंथातील संदर्भांवर आधारित संत श्री गजानन महाराजांच्या जीवनकथेवरील श्री गजानन कथानक या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आलेया पुस्तकाचे लेखन श्रीमती तारा प्रद्युम्न देशपांडे व डॉ. सौ. गौरी योगेश बनसोड यांनी केले आहे. संपादनाची जबाबदारी विवेक कवठेकर यांनी पार पाडली असून, कथाचित्रण प्रा. अजय रायबोले यांनी केले आहे. मुखपृष्ठाची आकर्षक रचना प्रा. भूपेंद्र जयस्वाल यांनी केली आहे.शनिवार, १७ जानेवारी २०२६ रोजी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे पार पडलेल्या या महापारायण सोहळा व पुस्तक प्रकाशन कार्यक्रमास शैक्षणिक, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १९ जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# पराभूत उमेदवारांच्या पत्राचा मुद्दा तापायला सुरुवात। ...

# अमरावती मनपेत सत्तेचा पेच; भाजप मोठा पक्ष, पण रिमोट 'युवा स्वाभिमान'कडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती :** शुक्रवारी सायंकाळी महानगरपालिका निवडणुकीचे निकाल स्पष्ट होताच शहरातील सत्तासमीकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. ८७ सदस्यांच्या सभागृहात सत्ता स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेला ४४ हा जादुई आकडा गाठणे भाजपसाठी अवघड ठरणार असल्याचे चित्र आहे. सर्वाधिक २५ जागा जिंकून भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी सत्तेची चावी मात्र आमदार रवी राणा यांच्या 'युवा स्वाभिमान' पक्षाकडे असल्याचे स्पष्ट झाले आहे.निवडणुकीपूर्वी अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस 'किंगमेकर' ठरेल, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, प्रत्यक्ष निकालात राष्ट्रवादीला केवळ ११ जागांवर समाधान मानावे लागल्याने त्यांची सौदेबाजीची ताकद सध्या तरी कमी झाली आहे. याउलट, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने १५ जागा जिंकत भाजपसमोर तगडे राजकीय आव्हान उभे केले आहे. या निकालामुळे सत्तास्थापनेचे सर्व गणित युवा स्वाभिमानभोवती फिरू लागले आहे.भाजपला बहुमतासाठी युवा स्वाभिमानच्या १५ आणि शिंदे गटाच्या शिवसेनेच्या ३ नगरसेवकांची साथ अनिवार्य ठरणार आहे. या संभाव्य युतीचा आकडा ४३ वर येत




असल्याने भाजपला आणखी एका नगरसेवकाचा पाठिंबा शोधावा लागणार आहे. त्यामुळे भाजप कोणाला सोबत घेते आणि कोणत्या अटींवर सत्ता स्थापन करते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.दरम्यान, पदांसाठी मोठ्या प्रमाणात 'बार्गेनिंग' रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रवी राणा हे याआधीही भाजपसोबत राहिले असले, तरी आता त्यांच्या पक्षाकडे असलेल्या १५ जागांमुळे त्यांची सौदेबाजीची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. केवळ बाहेरून पाठिंबा देण्यापेक्षा मनपाच्या सत्तेत निर्णायक सहभाग मिळवण्यावर त्यांचा भर राहणार असल्याचे संकेत आहेत. विशेषतः स्थायी समिती सभापतीपद किंवा उपमहापौरपदासाठी युवा स्वाभिमानकडून ठाम दावा केला जाऊ शकतो, अशी चर्चा आहे.दुसरीकडे, काँग्रेसने १५ आणि एमआयएमने १२ जागा जिंकत चांगली कामगिरी केली असली, तरी सत्तास्थापनेच्या समीकरणापासून हे दोन्ही पक्ष सध्या दूर असल्याचे दिसते. राष्ट्रवादीची ताकद घटल्याने भाजपविरोधी आघाडी उभी राहण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे भाजपची सत्ता येण्याची चिन्हे असली, तरी मनपाच्या सत्तेचा सुकाणू नेमका कोणाच्या हातात असेल, याचा अंतिम निर्णय रवी राणा यांच्या अटी व भूमिकेवरच अवलंबून राहणार आहे.

### अमरावती निवडणूक पराभवाचे सखोल विश्लेषण होणार

# चौकशीसाठी विशेष टीम पाठवणार : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९नागपूर-** अमरावती महापालिका निवडणुकीतील पराभवाचे सखोल विश्लेषण करणे आवश्यक असून, पराभूत उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेतली जाईल. यासाठी अमरावती येथे विशेष चौकशी टीम पाठवण्यात येणार असून, कोणी विरोधात काम केले याची सखोल चौकशी करण्यात येईल. त्यानंतर संपूर्ण परिस्थितीचा अभ्यास करून पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपूर येथील जिल्हा नियोजन भवनात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनीअमरावतीतील निवडणूक पराभव, महापौर पदाचा कालावधी, युतीचे राजकारण तसेच



विरोधकांच्या आरोपांवर स्पष्ट भूमिका मांडली.अमरावतीमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांमध्ये नाराजी असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले की, निवडणुकीत नेमके काय घडले, कोणी पक्षविरोधी काम केले का, याची चौकशी केली जाईल. पराभूत उमेदवारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्याची दखल घेण्यासाठी विशेष टीम अमरावतीला पाठवली जाणार आहे.मुंबईतील महापौर पदाचा अडीच-अडीच वर्षांचा कार्यकाळ वाटप करण्याच्या मागणीवर बोलताना ते म्हणाले की, शिवसेनेची अशी मागणी असल्यास ती योग्य पटलावर चर्चेसाठी घेतली जाईल. भाजपच्या कोअर कमिटीमध्ये यावर सविस्तर चर्चा होईल. भाजप-शिवसेना युतीबाबत सकारात्मक भूमिका मांडत त्यांनी सांगितले की, राज्यातील अनेक ठिकाणी ही युती होत असून, ती निश्चितच चांगली बाब आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींवर भाष्य करताना उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार यांच्या भेटीबाबत बावनकुळेम्हणाले, त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी बॅलेट पेपरवर निवडणूक घ्यावी, अशी केलेली मागणी ही जुनीच कॅसेट असल्याची टीका त्यांनी केली. यापूर्वी २०० मतांनी पराभव झाल्यानंतरही त्यांनी अशीच भूमिका घेतली होती, आता पुन्हा तीच मागणी पुढे आणली जात असल्याचे बावनकुळे म्हणाले.शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांच्या आरोपांवर प्रत्युत्तर देताना ते म्हणाले की, आरोप करणे हेच त्यांचे रोजचे काम झाले आहे. उद्धव ठाकरे यांच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळाची आणि आमच्या एका वर्षाच्या कामकाजाची तुलना केली तरी वास्तव समोर येईल,

# महानगरपालिकेत सत्तासंघर्ष तीव्र; शिंदे गटाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

## अडसूळ म्हणतात वेट अँड वॉच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने २५ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपले स्थान कायम राखले असले, तरी अद्याप सत्तास्थापनेचा स्पष्ट मार्ग पक्षाला मिळालेला नाही. बहुमताचा आकडा गाठण्यासाठी आवश्यक असलेले संख्याबळ अपुरे ठरत असल्याने आता राजकीय हालचालींना वेग आला आहे.



या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील घटक पक्षांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.युवा स्वाभिमान पक्षाला १५ जागा मिळाल्या असून पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी सत्ता स्थापन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसची गरज भासणार नसल्याचे वक्तव्य केले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय गणिते अधिकच गुंतागुंतीची झाली आहेत. दरम्यान, महायुतीतील महत्त्वाचा घटक असलेल्या शिवसेना शिंदे गटाकडे सध्या सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. शिंदे गटाचे तीन नगरसेवक निवडून आले असून, ही संख्या सत्तास्थापनेत 'किंगमेकर' ठरू शकते.शिवसेना शिंदे गटाचे राष्ट्रीय सचिव व माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी सध्या आम्ही 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असल्याचे स्पष्ट केले आहे. ते म्हणाले की, आमची भाजपसोबत नैसर्गिक युती आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी आमची गरज लागणार हे निश्चित असले तरी अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी याबाबत चर्चा झाली असून परिस्थितीचा आढावा घेऊन येत्या काही दिवसांत निर्णय घेतला जाईल.युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष रवी राणा यांनी आपली भूमिका जाहीर केली असली तरी त्यांच्या पक्षाचा निर्णय त्यांनाच घ्यायचा आहे, असेही अडसूळ यांनी नमूद केले.

महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देखील स्वतंत्रपणे आपला निर्णय घेईल, त्यावर भाष्य करणे उचित नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. आमच्या पक्षाच्या हिताचा विचार करूनच आम्ही पुढील भूमिका ठरवू, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

निवडणुकीपूर्वी भाजपकडून शिवसेना आणि युवा स्वाभिमान पक्षासोबत एकाचवेळी युतीसंदर्भात चर्चा सुरू होती.

मात्र त्या वेळी युती होऊ शकली नाही. आता निवडणूक निकालानंतर परिस्थिती स्थिरस्थावर झाल्यावर योग्य निर्णय घेता येईल, असा विश्वास अडसूळ यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे सत्तास्थापनेसाठी विरोधकांकडूनही आम्हाला विचारणा झाली असल्याचे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षांकडूनही हालचाली सुरू असून योग्य वेळी शिवसेना शिंदे गट आपली स्पष्ट भूमिका जाहीर करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.-

# महापालिका सभागृहात महिलांची ऐतिहासिक कामगिरी

## ४७ महिला नगरसेविकांची दमदार एन्ट्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती-** अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीत यंदा महिलांनी राजकारणात आपली ताकद ठळकपणे सिद्ध केली आहे. २२ प्रभागांतील ८७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत तब्बल ४७ महिला उमेदवार विजयी ठरल्या असून, सभागृहात महिलांचे प्रतिनिधित्व ५४ टक्क्यांवर पोहोचले आहे. यामुळे अमरावती महापालिकेच्या इतिहासात महिलांची ही सर्वाधिक उपस्थिती ठरली आहे. उर्वरित ४० जागांवर पुरुष नगरसेवक निवडून आले आहेत.महापालिका निवडणुकीत एकूण ६६१ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये ३१७ महिला तर ३४४ पुरुष उमेदवारांचा समावेश होता. विशेष म्हणजे ८७ पैकी ४४ जागा महिलांसाठी आरक्षित होत्या. मात्र आरक्षित जागांपुरतेच महिलांचे यश मर्यादित न राहता खुल्या जागांवरही महिलांनी विजय मिळवत आपली पकड मजबूत केली आहे. १५




जानेवारी रोजी झालेल्या मतदानात महिलांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावला, तर १६ जानेवारीला निकाल जाहीर झाले.यंदाच्या निवडणुकीतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नव्या चेहऱ्यांना मिळालेली संधी. सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी युवा आणि नवोदित उमेदवारांवर विश्वास टाकला होता. हा निर्णय मतदारांनीही मान्य केल्याचे निकालातून स्पष्ट झाले. एकूण ८७ पैकी ५१ जागांवर पहिल्यांदाच निवडून आलेले नगरसेवक सभागृहात दाखल झाले आहेत. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे प्रशांत धर्माळे, भाजपचे ऋषिकेश किशोर जाधव व अजय जयस्वाल देशमुख, युवा स्वाभिमान संघटनेचे सचिन भेंडे यांच्यासह विविध पक्षांतील अनेक युवा उमेदवारांना पहिल्यांदाच महापालिकेच्या सभागृहात प्रवेश मिळाला आहे. या नव्या चेहऱ्यांनी अनेक दिग्गज नेत्यांना पराभूत करत मतदारांचा बदलता कल अधोरेखित केला आहे.अल्पसंख्याक प्रतिनिधित्वाच्यादृष्टीनेही यंदाची निवडणूक महत्त्वाची ठरली आहे. एकूण १७ मुस्लीम नगरसेवक निवडून आले असून, यामध्ये एमआयएमचे ११, काँग्रेसचे ३, बसप व वंचित बहुजन आघाडीचे प्रत्येकी १ नगरसेवक सभागृहात पोहोचले आहेत. मागील महापालिकेत १८ मुस्लीम नगरसेवक होते, त्याच्या तुलनेत यंदा थोडी घट झाली असली तरी प्रतिनिधित्व कायम राहिले आहे.महिलांचा वाढता सहभाग, नव्या चेहऱ्यांची दमदार एन्ट्री आणि विविध समाजघटकांचे प्रतिनिधित्व यामुळे अमरावती महापालिकेचे नवे सभागृह अधिक सक्षम आणि परिवर्तनशील ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### 'एमआयएम'ची कामगिरीत सुधारणा

# वंचित बहुजन आघाडीची यशस्वी 'एन्ट्री'

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९ अमरावती** महानगर पालिका निवडणुकीत २०१७ मध्ये ४५ उमेदवारांसह बहुमत मिळवणाऱ्या भाजपला 'धक्का' देत युवा स्वाभिमानने (वायएसपी) यंदाच्या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली. भाजपाचे यंदा २५ उमेदवार निवडून आले. २०१७ मध्ये युवा स्वाभिमानचे ३ उमेदवार विजयी झाले होते. यंदा त्यांचे १५ उमेदवार विजयी झालेत. गेल्या वेळच्या तुलनेत वायएसपीचे १२ उमेदवार वाढले आहेत. आश्चर्याची बाब अशी की, भाजपाने निवडणुकीच्या चार दिवस आधी वायएसपीसोबत युती तोडली होती. दोन्ही पक्षांची युती असतील तर दोघांचे एकूण ४० उमेदवार विजयी झाले असते. येथे भाजपाचा डाव त्यांच्याच अंगलट आला.




त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजीत पवार गटाने यंदा प्रथमच निवडणुकीत सर्वाधिक ८५ उमेदवार दिले होते. मात्र, त्यांचे ११ उमेदवारच निवडून आले आहेत. मात्र, या पक्षाच्या जिल्ह्यातील पक्षनेतृत्त्वाने २३ ते २५ उमेदवार निवडून येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ती फोल ठरली. विशेष बाब अशी की, यंदा मतदारांनी सर्वच अपक्षांना नाकारले तर एमआयएमने गेल्या वेळच्या कामगिरीत सुधारणा करीत १२ उमेदवार निवडून आणले.

# महापालिका निवडणुकीत 'नोटा'चा कौल

## ७.६७ टक्के मतदारांनी उमेदवारांना नाकारले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती**

महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांप्रती असलेली मतदारांची नाराजी 'नोटा' या पर्यायातून स्पष्टपणे समोर आली आहे. झालेल्या मतदानात तब्बल २७,८६७ मतदारांनी 'नोटा'चा वापर केला असून हे एकूण मतदानाच्या ७.६७ टक्के इतके आहे. निकालांती ही बाब स्पष्ट झाली.लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी प्रत्यक्ष मतदान करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, पसंतीचा उमेदवार नसल्यास अनेक मतदार मतदानापासून दूर राहतात, असे निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आले होते. यावर उपाय म्हणून 'नोटा' हा सक्षम पर्याय उपलब्ध करून देण्यात आला



आहे.या महापालिका निवडणुकीत २२ प्रभागांमधून ८७ सदस्यपदांसाठी ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यामध्ये १२६ अपक्ष उमेदवारांचा समावेश होता. उमेदवारी वाटपाचा घोळ मतदानाच्या तीन दिवसांपूर्वीपर्यंत सुरू होता. मतदारांची नाराजी 'नोटा'च्या माध्यमातून व्यक्त झाल्याचे दिसून आले.'नोटा' हे वैध मत असून मतदाराचे मत पूर्णपणे गोपनीय राहते. मतदानापासून दूर न राहता प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी 'नोटा' देत असल्याने लोकशाही अधिक पारदर्शक व सशक्त करण्याच्या दिशेने हा पर्याय महत्त्वाचा ठरत आहे.

प्रभाग १ मध्ये १२७६, २ मध्ये १४४४, ३ मध्ये ११२७, ४ मध्ये ५४२, ५ मध्ये १५८५, ६ मध्ये ९३८, ७ मध्ये ११२९, ८ मध्ये १३२०, ९ मध्ये ११२९, १० मध्ये १५११, ११ मध्ये १३६६, १२ मध्ये १४६०, १३ मध्ये १२८०, १४ मध्ये २०१, १५ मध्ये २०३, १६ मध्ये ६०७, १७ मध्ये १८१९, १८ मध्ये १४८७, १९ मध्ये १८८५, १९ मध्ये १८८५, २० मध्ये २२३०, २१ मध्ये १०२५ व प्रभाग २२ मध्ये 'नोटा'ला ८४७अशी एकूण २७,८६७ मते मिळाली.

# अमरावती महानगरपालिकेत ४ माजी महापौरांपैकी ३ विजयी

## उपमहापौरांमध्ये मात्र एकालाच यश, तिघांचा पराभव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती-** अमरावती पालिका निवडणुकीत ४ माजी महापौर आणि ४ माजी उपमहापौर रिंगणात होते. यापैकी तीन माजी महापौरांनी विजय मिळवला, तर एकाला पराभवाचा सामना करावा लागला. याउलट, माजी उपमहापौरांमध्ये केवळ एकालाच यश मिळाले, तर तिघे पराभूत झाले.

विजयी झालेल्या माजी महापौरांमध्ये काँग्रेसचे विलास इंगोले आणि भाजपचे चेतन गावंडे व संजय नरवणे यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या चरणजीत कौर उर्फ रिना नंदा यांना मात्र पराभव पत्करावा लागला.

निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या ४ माजी उपमहापौरांमध्ये भाजपचे चेतन पवार, कुसुम साहू आणि संध्याताई टिकले, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख जफर शेख जब्बार यांचा समावेश होता. यापैकी केवळ शेख जफर शेख जब्बार यांनाच विजय मिळवता आला, तर इतर तिघांना पराभवाचा सामना करावा लागला.

साईनगर, प्रभाग क्रमांक १९ मधून भाजपचे माजी महापौर चेतन गावंडे यांनी निवडणूक लढवली. या प्रभागात आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने पूर्ण ताकद



लावली होती आणि तुषार भारतीय यांच्यासारख्या दिग्गज उमेदवाराचा पराभव केला होता. मात्र, चेतन गावंडे आपला पारंपरिक गड राखण्यात यशस्वी ठरले. भाजपचे संजय नरवणे विलासनगर प्रभागातून विजयी झाले, तर विलास इंगोले यांनी अंबागेटच्या आतील जुन्या अमरावती शहरातून सर्वाधिक मताधिक्य मिळवत विजय संपादन केला. माजी उपमहापौरांच्या बाबतीत या निवडणुकीचा निकाल काहीसा नकारात्मक राहिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख जफर शेख जब्बार हे प्रभाग क्रमांक १५, छायानगर-पठाणपुरा येथून विजयी झाले. पराभूत झालेल्यांमध्ये प्रभाग क्रमांक १८ राजापेठचे चेतन पवार, प्रभाग क्रमांक ६ विलासनगर-मोरबागच्या कुसुम साहू आणि प्रभाग क्रमांक १० बेनोडा-भीमटेकडी येथील संध्याताई टिकले यांचा समावेश आहे.विशेष म्हणजे, पराभूत झालेल्या माजी उपमहापौरांपैकी काहींना गेल्या सभागृहात सोबत काम केलेल्या उमेदवारांविरुद्धच निवडणूक लढावी लागली. भाजपचे चेतन पवार यांना शिवसेनेतून (उबाठा) युवा स्वाभिमान पक्षात गेलेले माजी नगरसेवक प्रशांत वानखडे यांनी पराभूत केले. तसेच, कुसुम साहू यांना शिवसेनेच्या माजी नगरसेविका रेखा तायवाडे यांनी हरवले, तर संध्याताई टिकले यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवख्या उमेदवार अर्चना पाटील यांनी पराभूत केले.

# अमरावती महापालिका निवडणुकीत अपक्षांना सपशेल नाकारले

## १२० पैकी एकाही उमेदवाराला विजय मिळवता आला नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती**

२६अमरावती महापालिका निवडणुकीच्या शुक्रवारी झालेल्या मतमोजणीत मतदारांनी अपक्ष उमेदवारांना सपशेल नाकारल्याचे स्पष्ट झाले आहे. एकूण ६६१ उमेदवारांपैकी १२० जणांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती, परंतु एकाही उमेदवाराला विजय मिळवता आला नाही.

पालिका सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अपक्ष उमेदवारांना किमान २० ते कमाल दीड हजार मते मिळाली आहेत. महापालिकेच्या २२ प्रभागांमधील ८७ जागांसाठी ही निवडणूक झाली. या निवडणुकीत सर्वच प्रभागांमध्ये चुरस होती आणि अपक्षांनाही काही जागा मिळतील असा अंदाज होता, मात्र तो फोल ठरला.

माघार घेण्याच्या अंतिम दिवसापर्यंत एकूण ६६१ उमेदवारांनी आपली उमेदवारी कायम ठेवली होती. यापैकी ५४१ उमेदवार विविध राजकीय पक्षांचे होते, तर १२० उमेदवार अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते. या १२० अपक्ष उमेदवारांपैकी एकालाही मतदारांनी विजयापर्यंत पोहोचू दिले नाही.

मतदारांनी अपक्षांना नाकारण्यामागे काही प्रमुख कारणे असल्याचे दिसून येते. अपक्ष उमेदवार निवडून आल्यास काही वेळा 'घोडेबाजार' होण्याची शक्यता असते, ज्यामुळे मतदारांना नुकसान सोसावे लागते. तसेच, अपक्षांना राजकीय पाठबळ नसल्याने ते प्रभागाच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांकडून पुरेसा निधी मिळवू शकत नाहीत, अशी मतदारांची धारणा आहे. महापालिका निवडणुकांमध्ये अपक्षांना नाकारण्याची ही भूमिका



गेल्या काही वर्षांपासून अधिक दृढ होत आहे.

दिव्य मराठीच्या आकडेवारीनुसार, १९९२ मध्ये मनपाची पहिली निवडणूक एक सदस्यीय निवड पद्धतीने झाली होती, ज्यात तब्बल २८ अपक्ष उमेदवार निवडून आले होते. त्यानंतर १९९७ मध्ये ही संख्या २५ पर्यंत खाली आली.

२००२ मध्ये ५, २००७ मध्ये ७, २०१२ मध्ये ८ आणि २०१७ मध्ये केवळ एक अपक्ष उमेदवार नगरसेवक म्हणून विजयी झाला होता. यंदाच्या निवडणुकीत, तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या या मतदानात अमरावतीकर मतदारांनी एकाही अपक्ष उमेदवाराला निवडून न देण्याचा निर्णय घेतला.

# लग्न सराईचे बजेट कोलमडले; ३ तोळे सोन्यासाठी लागेल १०० किंटल सोयाबीन तर ५६ किंटल कापूस

## शेतकऱ्यांच्या मुलाबाळांच्या लग्नाचा प्रश्न ऐरणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मोर्शी**

शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नसला तरी सोन्या आणि चांदीचे भाव मात्र गगनाला भिडले आहेत. याचा परिणाम लग्नसराईवर झाला असून आपल्या मुलांचे लग्नकरावे तरी कसे असा यक्षप्रश्न शेतकऱ्यांच्या समोर उभा ठाकला असल्याचे ग्रामीण भागात सुरू असलेल्या चर्चेवरून दिसून येत आहे. दिवसेंदिवस पर्यावरणातील बदलामुळे शेतीवर याचा मोठा परिणाम दिसून येत आहे. त्यातच जागतिक स्तरावर होत असलेल्या बदलामुळे देखील मोठे परिणाम दिसून येत आहेत. दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई परंतु शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही अशा परिस्थितीमुळे शेतकरी वर्ग गांगरून गेलेला आहे. दरवर्षी पिक जोमाने येईल भाव चांगला मिळेल सरकार मायबाप आपल्या पाठीशी उभा राहील या भाबड्या आशेवर उत्साहाने पुन्हा शेती करणारा शेतकरी यावर्षी पार कोलमडून पडल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांना शेतीमालाला भाव नाही तर तुटपुंजी मदतीचे गाजर देऊन शेतकऱ्यांची बोळवण करण्यात येत असून शेतकऱ्यांच्या पाठीमागील दुःखाची काळी छाया मात्र कोणालाही दिसून येत नाही. यावर्षी अतिवृष्टी आणि महापुरामुळे मोठ्या प्रमाणात शेतजमिनीचे नुकसान होऊन पिके वाहून गेली होती. दुष्काळ व अतिवृष्टीचा तडाका बसल्याने शेतकऱ्यांची बाजू घेऊन मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरलेल्या संघटना आणि शेतकरी नेते मात्र निवडणुका लागताच भूमिगत झाल्याचे दिसून येत आहे. अतिवृष्टीमुळे ओल्या दुष्काळाचे सावट दिसताच सर्वत्र शेतकऱ्यांच्या बाजूने वातावरण निर्मिती होत असल्याचे पाहून शासनाने निवडणुकीचा डाव टाकून अलगदपणे लक्ष वळवले आणि शेतकऱ्यांचा मालाचा भाव वाढविण्यासाठी आणि एकरी ५० हजार रुपये मदत मिळावी या मागण्या व इतर प्रश्न जिथे आहे तिथेच राहिले. शेतीचे उत्पादन तर वाढले पण

शेतकऱ्यांचे उत्पन्न मात्र या प्रचलित व्यवस्थेत वाढू नये अशी व्यवस्थाच सरकारने आधिच करून



ठेवली असल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न मात्र वाढले नाही. शेतकरी वर्गाला समजून येऊं नये म्हणून शेतीला इन्कमटॅक्स मधुनच वगळले. कारण त्यांनी शेतीचा हिशोब ठेऊ नये. तसाही शेतकरी शेतीचा हिशोब ठेवत नसल्याने तो केव्हा कर्जबाजारी होत गेला हे त्याचं त्यालाच समजले नाही. देशाचे उत्पादन वाढले पाहिजे या उत्सुकतेपोटी भान विसरून पुढे चालत गेला. तरी त्याचे उत्पन्न वाढलेच नाही. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नसला तरी सोन्या आणि चांदीचे भाव मात्र गगनाला भिडले आहेत. सोन्या आणि चांदीचे भाव दररोज वाढत असल्याने आता लग्नसराईमध्ये लग्नकार्य कसे पार पाडावे याचा पेच निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. लग्न म्हटले की सोन्या चांदीचे आभूषणे घ्यावेच लागतात. सोन्याचा भाव जवळपास दीड लाखापर्यंत प्रति तोळा पोहोचत आहे. तर सोयाबीनचा भाव प्रतिक्विंटल सरासरी ४ ते ५ हजार रुपये आहे. कितीही कमी खर्चात मुला-मुलींचे लग्न केले तरीही २ ते ३ तोळ्याचे सोन्याचे दागिने करावेच लागतात. तिन तोळे सोन घेतो म्हटलं तर आताच्या घडीला ४ लाख ४५ हजार रुपयांचे वर पैसे मोजावे लागतात. म्हणजे जवळपास १०० ते ११० किंटल सोयाबीनच्या बरोबरीचे पैसे मोजावे लागतात. तर २०० क्विंटल च्या आसपास ज्वारी सद्यस्थितीत दहा ग्राम सोन्याचा भाव १ लाख ४५ हजार रुपये तर चांदी प्रति किलो २ लाख ८२ हजार रुपयापर्यंत पोहोचली आहे. भाव वाढीने सर्वसामान्य जनतेचा बजेट कोलमडला असून सोने-चांदी घेणे आवाक्याचे बाहेर गेले आहे. जागतिक स्तरावर होत असलेले बदल, युद्धाची चर्चा यामुळे भाव वाढ होत असून लग्नात देखील सोने खरेदीवर मर्यादा आल्याचे दिसून येत आहे. गोरगरीब यामुळे मोठ्या चिंतेत असून दरवर्षी किडूकमिडूक करून बचत करणारे यांना देखील याचा फटका बसला आहे. सोने आणि चांदीच्या व्यवसायावर देखील परिणाम झाला असून व्यवसाय मंदावले आहे. जुने घेतलेले सोने कोणीही विक्री करताना दिसत नाही. दररोजच्या भाववाढीचा सुवर्ण व्यवसायिकांना त्रास होत आहे.तर कापूस विकतो म्हटलं तर ५० ते ६० क्विंटल कापूस विकावा लागेल त्यावेळेस लग्नामध्ये ३ तोळे सोन्याचे दागिने बधू करिता घेता येतील. अन्यथा शेती विकल्याशिवाय शेतकऱ्यांसमोर पर्याय नसल्याचे दिसून येत आहे. दरवर्षी शेतीत घाटा येत असल्याने पूर्वीचे जवळ असलेले सोने हे सावकाराकडे गहाण ठेवून वर्षाचा तालमेळ बसविला जात असल्याची परीस्थिती दिसून येत आहे. फक्त दिपवाळीच्या वेळेसच सोने सोडून आणायचे आणि पुन्हा घाण ठेवायचे असंच चक्र वर्षानुवर्षांपसून सुरू आहे. या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याची त्याला संधीच मिळत नसून जोपर्यंत शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत हे दृष्टचक्र दिवसेंदिवस बिकट होत जाणार आहे.

# ब्राम्हणवाडा थडी ग्रामपंचायतच्या पिण्याच्या पाईपलाईन मध्ये मृत पक्षी आढळल्याने खळबळ

## श्री छत्रपती बहुद्देशीय संस्थेच्या वतीने ग्रामपंचायतला निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चा.बाजार**

चांदूर बाजार तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी या गावात ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाईनमध्ये मृत पक्षी आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीती आणि अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेमुळे पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

गावातील नागरिकांना मागील काही दिवसांपासून नळाच्या पाण्यातून दुर्गंधी येत असल्याचे जाणवत होते. काही नागरिकांनी ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर पाइपलाईनची पाहणी करण्यात आली. त्यावेळी



पाइपलाईनमध्ये मृत पक्षी आढळून आला. त्यामुळे अनेक दिवस हेच दूषित पाणी गावकरी वापरत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांना अशी शक्यता व्यक्त केली आहे की, पाण्याच्या टाकीचा वरचा काही भाग उघडा असल्यामुळे त्यातून पक्षी आत पडला असावा. तेथूनच हा पक्षी पाण्याच्या प्रवाहात जाऊन पाइपलाईनमध्ये आला असण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पाण्याच्या टाकीची झाकण व्यवस्था व सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

गावातील नागरिकांनी सांगितले की, पाणीपुरवठ्याच्या पाइपलाईनमध्ये काही ठिकाणी गळती असून त्यामुळे बाहेरील घाण, माती व किडे मिसळण्याचा धोका असतो. या घटनेनंतर नागरिकांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेबाबत चिंता वाढली आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारचे दूषित पाणी पिल्यास टायफॉईड, जुलाब, उलटी, पोटदुखी तसेच त्वचारोगासारखे आजार होऊ शकतात. त्यामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींसाठी हा धोकाअधिक गंभीर ठरू शकतो.या घटनेची दखल घेवुन श्री छत्रपती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष आकाश दाभाडे व पदाधिकारी व गावकऱ्यांनी पाणीपुरवठ्याची तातडीने तपासणी करावी, पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवावेत आणि टाकी व पाइपलाईनची योग्य स्वच्छता व दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ पाणीपुरवठा करावा, अशी मागणी केली आहे. व गावकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष दिले जावे, अशी सर्वांची मागणी आहे.निवेदन देतांना श्री छत्रपती बहुद्देशीय संस्थचे अध्यक्ष आकाश दाभाडे, सूरज इंगोले, ओम वसुले, प्रज्वल दामेधर, तुषार सातपुते, चेतन पोटे, शिवम सापधारे, अभिषेक पकळे, राहुल निचत, प्रफुल पोकळे, निलेश दारोकर, आशिष बीजवे, दुर्गेश साबळे, दत्ता पेटे आदी उपस्थित होते.

# अमरावतीच्या लेकीचा ठाणे महापालिकेत ऐतिहासिक विजयश्री

## खा. अनिल बोंडे यांच्या भगिनी माधुरी मेटांगे यांची नगरसेवक पदावर वर्णी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राज्यसभेचे खासदार तथा भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. अनिल बोंडे यांच्या भगिनी माधुरी मेटांगे-बोंडे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत ऐतिहासिक विजयश्री मिळवला आहे. भाजपच्या ठाणे शहर जिल्हा सचिव पदावर कार्यरत असलेल्या माधुरी मेटांगे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग १२ ब मधून नगरसेवक पदी निवडून आल्याने अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या विजयाबद्दल प्रतिक्रिया देताना त्यांनी मायबाप मतदारांचे आभार मानत जनकल्याणाचं व्रत असंच पुढे घेऊन जाणार असल्याचेही स्पष्ट केलं.



माधुरी मेटांगे हा ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विविध सामाजिक आणि राजकीय पदावर कार्यरत होत्या. त्या माध्यमातून त्यांनी आपल्या राजकीय वाटचालीला सुरुवात केली. खासदार अनिल बोंडे यांच्या भगिनी असलेल्या माधुरी मेटांगे यांनी वडील सुखदेवराव बोंडे, आई त्रिवेणी ताई बोंडे यांच्या पावलावर पाऊल टाकत ज्ञानदानाचा कार्य हाती घेतलं. व्यवसायाने शिक्षिका असलेल्या मेटांगे या दोन दशकांपासून भाजपमध्ये कार्यरत आहेत. ठाणे शहर जिल्ह्याच्या सरचिटणीस, सचिव यासह विविध पदावर त्यांनी आपल्या कर्तुत्वाने छाप सोडलेली आहे. लक्षवेधी सामाजिक संस्था, आदिवासी महिलांना रोजगार,महिला मुलींच्या सामाजिक प्रश्नांची जाण, त्या सोडवण्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा, दीर्घकालीन उपाय योजना राबवून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी महत्त्वाचं कार्य केलं. गोरगरीब मुला मुलींना शालेय साहित्याचा वितरण करणे यासह विविध सामाजिक कार्यामध्ये सक्रियपणे सहभाग घेऊन मेटांगे यांनी थेट पब्लिक कनेक्टवर भर दिला. नारी तू नारायणी, अनुलोम अनूगामी लोकराज्य महाभियान, उत्सव स्त्रीशक्तीचा, हिंदू जागृती न्यास अशा विविध सामाजिक स्तरावर काम करून त्यांना वेगवेगळे सन्मान देखील मिळाले आहेत. यासह त्यांच्या विविध सामाजिक कार्याची दखल घेत भाजपकडून त्यांना ठाणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १२ ब मधून उमेदवारी देण्यात आली होती. मूळच्या अमरावतीकर असलेल्या माधुरी मेटांगे यांनी भाजपने आपल्यावर दाखवलेल्या विश्वाला सार्थक ठरवत ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक १२ ब मधून ऐतिहासिक विजयशी मिळवला आहे. या विजयाचे श्रेय त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, मतदार, भाजपच्या पदाधिकाऱ्यांना देतं मायबाप जनतेचे आभार मानले आहेत. नागरिकांनी जनकल्याणाच, लोककल्याणाचे व्रत पुढे घेऊन जाण्याची मला जी संधी दिली त्या संधीच मी पुढच्या काळात सोनं करेल, प्रभागाचा विकास अधिक चांगल्या पद्धतीने कसा करता येईल, यासाठी देखील आपण कार्यरत राह अशी ग्वाही सुद्धा माधुरी मेटांगे यांनी दिली.

# शिक्षिका शीतल सरदार यांची राष्ट्रीय पातळीवर भरारी

## राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत मारली बाजीराष्ट्रीय स्पर्धेसाठी ठरल्या पात्र;अभिनंदनाचा होतोय वर्षाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** अध्यापनाचे कार्य , कुटुंबाची जबाबदारी आणि मनात जपलेली कलेची आवड या तिन्हींचा समतोल साधत निर्मला विद्यालय, कापुसतळणी येथील सहाय्यक शिक्षिका शीतल अर्जुन सरदार (तायडे) यांनी राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरण्याचा मान मिळविला आहे.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,



महाराष्ट्र पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने १७ जानेवारी रोजी हिंगोली येथे आयोजित राज्यस्तरीय शिक्षक व अधिकारी लोकनृत्य स्पर्धेत शिक्षिका शीतल सरदार यांनी लावणी या लोकनृत्य संवर्गात सादर केलेल्या दमदार नृत्याने परीक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेत राज्यभरातील अनेक शिक्षक व अधिकारी यांनी विविध लोकनृत्य प्रकारांत सहभाग घेतला होता. मात्र अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत केवळ दहा स्पर्धकांची निवड करण्यात आली, त्यामध्ये शीतल सरदार यांनी पहिल्या दहामध्ये स्थान मिळवत राष्ट्रीय पातळीवर जाण्याची संधी मिळविली.अध्यापनाच्या दैनंदिन कामकाजासोबत कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळतही कलेची आवड जिद्दीने जोपासता येते, हे शीतल सरदार यांनी आपल्या यशातून दाखवून दिले आहे. त्यांच्या या यशामागे पती विशाल तायडे (महाराष्ट्र सुरक्षा बल), आई लतिका सरदार, सासरे ज्ञानेश्वर तायडे व सासू प्रमिला तायडे यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या अभूतपूर्व यशाबद्दल प्राचार्य रेव्ह. फादर तवामणी, उपप्राचार्य डालके सर, पर्यवेक्षिका बहुरूपी मॅडम तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंदांनी शीतल सरदार यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.शिक्षक असूनही कला, संस्कृती व लोकपरंपरेचा अभिमान जपत राष्ट्रीय स्तरावर पोहोचलेली ही यशोगाथा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# स्वीकृत सदस्य डॉ. असित पसारी यांचा धामणगाव मेडिकल असोसिएशनकडून सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धामणगाव रेल्वे**

धामणगाव रेल्वे नगर परिषदेत स्वीकृत सदस्यपदी निवड झाल्याबद्दल डॉ. असित पसारी यांचा धामणगाव मेडिकल असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात



तसेच सामाजिक कार्यात डॉ. पसारी यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या प्रसंगी धामणगाव मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला डॉ. आकाश येंडे, डॉ. अमित गुल्हाने, डॉ. राजेश वाटाने, डॉ. भरत पालीवाल, डॉ. मनिष अम्रुरकर, डॉ. सागर राऊत, डॉ. धरमचंद गुप्ता तसेच डॉ. पवन शर्मा यांनी उपस्थित राहून डॉ. असित पसारी यांचे अभिनंदन केले.

# बडनेरा विधानसभेसाठी महापालिकेत स्वीकृत नगरसेवक द्या

## काँग्रेस कार्यकर्त्यांची प्रदेश व शहराध्यक्षांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती–** बडनेरा विधानसभेच्या सर्वांगीण व लोकाभिमुख विकासासाठी अमरावती महानगरपालिकेमध्ये किमान एक स्वीकृत नगरसेवक पद देण्यात यावे, अशी एकमुखी मागणी बडनेरा विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस कार्यकर्ते व नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष तसेच शहराध्यक्ष यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बडनेरा विधानसभा क्षेत्र सध्या महापालिकेतील प्रभावी प्रतिनिधित्वापासून वंचित आहे. त्यामुळे पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता, शिक्षण व आरोग्य यांसारख्या मूलभूत नागरी प्रश्नांना अपेक्षित न्याय मिळत नाही. या समस्यांवर प्रभावीपणे आवाज उठवण्यासाठी आणि प्रशासनापर्यंत नागरिकांच्या मागण्या पोहोचवण्यासाठी सक्षम प्रतिनिधी असणे आवश्यक आहे.तसेच, पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवणे व त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही पक्षाची नैतिक जबाबदारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. त्यामुळे बडनेरा विधानसभेच्या अस्तित्व, विकास व संघटन बळकटीसाठी किमान अडीच वर्षांच्या कालावधीसाठी एक स्वीकृत नगरसेवक पद देण्यात यावे, अशी नम्र पण ठाम मागणी करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर पूर्ण विश्वास व्यक्त करत प्रतिसादाची अपेक्षा काँग्रेस कार्यकर्ता समीर जवंजाळ यांनी व्यक्त केली आहे.

# महिला महाविद्यालय येथे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय जोग चौक, अमरावती येथे शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आंतरकनिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर होत्या, तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून तक्षशिला महाविद्यालय, दारापूर येथील प्रा. डॉ. शितल तायडे उपस्थित होते. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते व प्रा. ममता पांडे यादेखील प्रामुख्याने उपस्थित होत्या. महाविद्यालयातील डिबेट क्लब तसेच वाणिज्य विभागातर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळून त्यांच्यामध्ये वक्तृत्व कलेची तसेच अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्र माच्या प्रास्ताविकामधुन महाविद्यालयाच्या डिबेट क्लबच्या प्रमुख प्रा. डॉ. शर्मिला देशमुख यांनी आयोजनामागची भूमिका विशद केली.उद्घाटक व प्रमुख पाहुणे डॉ. शीतल तायडे यांनी विद्यार्थीदशेत आपले कौशल्य वाढविणे तसेच वक्तृत्व कला आत्मसात करणे किती आवश्यक आहे हे विविध उदाहरणांद्वारे रंजक पद्धतीने स्पष्ट केले. तसेच वक्तृत्वस्पर्धेत भाग घेतांना कोणत्या गोष्टींचे भान ठेवले पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन गोकुळ देशमुख यांनी केले. विविध कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने भाग घेतला होता.स्पर्धेकरिता ए आय चे आव्हान, सावित्रीबाईंचे स्वप्न अजूनही अपूर्णच, मोबाईलमुळे तरुणाई एका घातक वळणावर, राष्ट्रीय एकात्मतेमध्ये समाज माध्यमांची भूमिका, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण रोजगारासाठी पूरक की अनावश्यक, पालक आणि मुलांमधील हरवत चाललेला संवाद



व संवेदना इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रस्तुत केले.स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून वर्षा जदबन्सी, संजीवनी मोगरकर, प्रा. डॉ. अर्चना पोले यांनी अत्यंत पारदर्शकपणे परीक्षण केले. बक्षीस वितरण सोहळ्याकरिता अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. नीलिमा राऊत व सौ. आरती मोरे उपस्थित होत्या. प्रा. ममता पांडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धकांचे विशेष कौतुक करत स्पर्धेतील संवेदनशील विषयांवर विद्यार्थ्यांनी अत्यंत परखडपणे मत व्यक्त केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. परीक्षक वर्षा जदबन्सी यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर करत विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धात्मक प्रवासाकरिता शुभेच्छा दिल्या. स्पर्धेमध्ये विद्याभारती महाविद्यालयाची विद्यार्थिनी मनस्वी राजेंद्र तायडे ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली.१५०० रुपयांचे रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन तिचा गौरव करण्यात आला. नूतन कन्या शाळेची विद्यार्थिनी धनश्री अनिल खोडे हिने द्वितीय क्रमांक पटकावून १००१ रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र मिळविले.तिसऱ्या क्रमांकाचे ७०१ रुपयाचे रोख पारितोषिक मातोश्री विमलाबाई देशमुख ची विद्यार्थिनी पूर्वा प्रमोद सावंत हिला देण्यात आले. महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी माही इंगळे व नूतन कन्या शाळेची विद्यार्थिनी सेजल तिवारी यांनी उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त केले.सर्व सहभागी स्पर्धकांना महाविद्यालयातर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन प्रा. गणेश मुळे आणि आभार प्रदर्शन प्रा. दिपाली चिरांगे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर आणि डिबेट क्लब समन्वयक प्रा. डॉ. शर्मिला देशमुख यांच्या मार्गदर्शनामध्ये समिती सदस्यांनी वक्तृत्व स्पर्धेचे अत्यंत उत्कृष्ट असे आयोजन केले होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता नूतन विदर्भशिक्षण मंडळ सचिव प्रा. हितेश व्यास तसेच सर्व सन्माननीय कार्यकारिणी सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

# ही तर केवळ सुरुवात, भविष्यातील वाटचाल बहुमतासाठी

## आ. रवि राणांचा युवा स्वाभिमानच्या विजयी उमेदवारांना संदेश अभिनंदन सोहळ्यातुन पक्षाची ताकद वाढविण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीत युवा स्वाभिमान पार्टीने उल्लेखनीय यश संपादन केले असून, या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांच्या सन्मानार्थ आयोजित अभिनंदन सोहळ्यात आमदार रवी राणा यांनी सर्व विजयी उमेदवारांचे मनःपूर्वक स्वागत व अभिनंदन केले. या सोहळ्यात पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

युवा स्वाभिमान पार्टीने यावेळी एकूण ३१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. त्यापैकी १५ उमेदवारांनी विजय मिळवून पक्षाची ताकद सिद्ध केली. थोड्या फरकाने पराभूत झालेल्या उमेदवारांनाही आमदार रवी राणा यांनी विशेष महत्त्व दिले. पराभूत उमेदवारांचे मनोगत ऐकून घेण्यासाठी त्यांनी तब्बल पाच तास चर्चा केली. या चर्चेदरम्यान निवडणुकीतील त्रुटी, अनुभव, मतदारांचा प्रतिसाद तसेचभविष्यातील रणनीती यावर सविस्तर विचारमंथन करण्यात आले.यावेळी बोलताना आमदार रवी राणा म्हणाले की आज जरी १५ उमेदवार विजयी झाले असले तरी ही केवळ सुरुवात आहे. युवा स्वाभिमान पार्टी भविष्यात निश्चितच बहुमताकडे वाटचाल करेल. पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता, उमेदवार आणि पदाधिकारी हा पक्षाची ताकद आहे. त्यांनी विजयी उमेदवारांना जबाबदारीने काम करण्याचे आवाहन करताना शहराच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा संदेश दिला.या अभिनंदन सोहळ्यात युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून पक्षाची संघटनात्मक ताकद आणि आगामी काळातील राजकीय दिशा स्पष्टपणे दिसून आली. नवनिर्वाचित नगरसेवक सौ रजनी डोंगरे, अजय जयस्वाल, सौ गौरी शैलेंद्र मेघवानी, किशोर जाधव, श्री नाना उर्फ ज्ञानेश्वर आमले, श्रीमती सुमती ढोके, सचिन भेंडे, नंदा धनंजय सावदे, प्रा. प्रशांत वानखडे, महेश मूलचंदानी, योगेश विजयकर, अर्चना अशोक पांडे, प्रियंका भूषण पाटणे, अँड. सौ प्रीती हर्षल रेवणे उर्फ बनारसे, दीपक किसनलाल साहू उर्फ सम्राट यांचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी ह. भ.प. सागर देशमुख महाराज, निळकंठ, रावजी कात्रे, सुनील राणा, जयंतराव वानखडे, प्रमोद येवतीकर, कमलकिशोर मालानी, शिवदासजी घुले, गंगाधर आवारे, सुखदेव तरडेजा, संजय हिंगासपुरे, ज्योती सेरीसे, सोनाली नवले, संजय मुनोत, सत्येंद्रसिंग लोटे, गणेशदास गायकवाड, पुरुषोत्तम बजाज, सुरेशजी पडोळे, समाधान वानखडे, विनोद जायलवाल, विनोद गुहे, किशोर पिवाल, दिनेश सेठीया, मुकेश उसरे, आशिष गावंडे, निखिल आकोटकर, गौरी अमोल इंगळे, माधुरी बाखडे, सुरज मिश्रा, हर्षल रेवणे, अमोल पवार, स्वानंद पहुरकर, राजा बाखड, उदय पर्वतकर, घनश्याम डकरे, निकेश खुरखुरिया, विवेक चुटके, संजय माहुरकर, वंदना प्रशांत वानखडे, महेश्वरी बोरेकर, संगीता वाघ, राहुल बजाज, महेंद्र तुंडलियात, अविनाश काळे, नितीन मस्के, अजय बोबडे, आदी उपस्थित होते.

# अपने ही गिराते है नशे मन पे बिजलीया...

## भाजपातील गोल्डन गँग हद्दपार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

नुकत्याच पार पडलेल्या अमरावती महापालिकेच्या निवडणूकीत भारतीय जनता पार्टीचे दिग्गज नेते पराभूत झाल्याने महापालिके च्या राजकारणातील भाजपाची गोल्डन गँग हद्दपार झाली असल्याचा सूर शहरात उमटू लागला आहे. त्यामुळे कही खुशी तर कही गम दिसून येत आहे.

महापालिकेच्या निवडणूकीत भाजपाच्या गोटातून तिकीट वाटपापासून खऱ्या अर्थाने अर्तगत वाद पेटला होता. पक्ष म्हणजे स्वतःची जहागीर समजून भाजपाच्या काही स्वयंघोषीत पदाधिकाऱ्यांनी मनपा निवडणूकीची सर्व सुत्रे आपल्या हातात घेतली. त्यामध्ये काही पदाधिकारी मोठ्या नेत्यांची कटपुतली बाहुली आहे तर काही पदाधिकारी स्वयंघोषीत लिडर आहे. त्यांनी निवडणूकीत मुलाखाती घेवून आपल्या पध्दतीने उमेदवारांना तिकीटाचे वाटप केले. तिकीट वाटपामध्ये अनेक निष्ठावान कार्यक त्यांना डावलल्याने अनेकांनी या पदाधिकाऱ्यांनाच धारेवर धरत त्यांनी आपल्या मर्जीतल्या व पक्षाशी एकनिष्ठ नसलेल्या तसेच काल-परवा पक्षात आलेल्या उमेदवारांना तिकीट दिल्याचा आरोप केला. त्यानंतर याच चौकडीने युवा स्वाभिमान पक्षासोबत युती केली. प्रचार सुरु झाला त्यानंतर पुन्हा ही युती तोडली. त्याचा परिणाम म्हणजे स्पष्ट बहुमत असलेला भाजपा केवळ २५ वर येवून थांबला आहे.या २५ नगरसेवकांमध्ये काही नविन चेहरे तर काही जुन्या चेहऱ्यांना जनतेने पसंती दिली. मात्र भाजपामधील दिग्गज असलेले व ज्यांच्याकरीता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस हे अमरावतीतप्रचारासाठी आले ते माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय, माजी उपमहापौर चेतन गावंडे, माजी गटनेते सुनिल काळे, माजी उपमहापौर कुसूम साहू, संध्या टिकले, माजी स्थायी समिती सभापती विवेक कलोती, भाजपाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा गंगा खारकर आदी पराभूत झाल्या आहेत. काहींचा पराभव तर अगदी नवख्या उमेदवारांसारखा आहे. त्यामुळे यावर विचार करणे पक्षासाठी व उमेदवारांसाठी आवश्यक झाले आहे.दरम्यान, शिस्तीचा पक्ष म्हणून जाणाऱ्या ओळखल्या भाजपामधील फंदफितूरी व दुहीचे राजकारणयामुळे पक्षातील सर्व सामान्य कार्यकर्त्यांचा संयम आता सुटू लागला आहे. २०१७ मध्ये ४५ जागा काबीज करणाऱ्या भाजपाच्या पारड्यात केवळ २५ सदस्य संख्या पडल्याने कार्यकर्त्यांमधील घुसपूस व संताप प्रगट होवू लागला आहे. वरिष्ठांना आत्मचिंतन करण्याची गरज या निमीत्ताने झाली आहे.

### अपनेही गिराते है नशे मन पे बिजलीया...

भाजपाच्या गोटातून निवडणूकीसाठी उभे राहण्यासाठी गर्दी जास्त दिसून आली. त्यामुळे यातून चार निवडणे व त्यांना पक्षाच्या तिकीटा देणे हे दिव्य काम होते. असे असतांना ज्यांना पक्षाने तिकीट देतांना डावलले त्यातील काहींनी लगेच दुसरे पक्ष शोधले तर काहींनी शांत राहणे पसंत केले. परंतू भाजपातील या अर्तंगत कलहामुळे अपनेही गिराते है नशेमन पे बिजलीया... असे अनेक ठिकाणी पहायला मिळाले.

### भाजपाची गोल्डन गँग संपली

अमरावती महापालिकेच्या मध्ये असलेली कॉंग्रेसच्या गोल्डन गँग सारखी भाजपाचीही एक गोल्डन गँग होती. मात्र या निवडणूकीत ही गोल्डन गँग संपली आहे. भाजपातील नविन चेहरे व काही जुने चेहरे हे भाजपाचे सभागृहात नेतृत्व करणार असल्याची दुसरी बाजू देखील यावेळी अधोरेखीत होत आहे.

# कृषी पंपांना सोलर सक्तीच्या धोरणाविरोधात गुरुवारी तिवस्यात जनआंदोलन मोर्चा

## तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बैठकीत निर्णय; शेतकरी विरोधी धोरणाविरोधात शिरजगाव मोझरी गावातील शेतकऱ्यांचा उठाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १९तिवसा**

राज्य सरकारने कृषी पंपांसाठी सोलर सक्तीचे धोरण अवलंबवल्याने तिवसा तालुक्यातील हजारो शेतकरी विद्युत कनेक्शनच्या प्रतीक्षेत आहे. गेल्या ३ वर्षांपासून अनेक शेतकरी शेती पंपांसाठी विद्युत कनेक्शन मिळावे यासाठी विद्युत विभागाच्या चकरा मारत आहे. त्यामुळेच राज्य सरकारने शेतकरी विरोधी कृषी पंपाच्या सोलर सक्ती धोरणाला विरोध करण्यासाठी शुक्रवारी तिवसा येथील शासकीय विश्राम गृहावर तालुक्यातील शेतकऱ्यांची बैठक झाली. ज्यामध्ये येत्या गुरुवारी (ता.२२) रोजी तिवसा तहसीलदार यांना निवेदन देण्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जनआंदोलन मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सोलर पंप कनेक्शन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे ढगाळ वातावरण, नादुरुस्त सोलर, वन्यप्राण्यांमुळे सोलर प्लेटचे नुकसान होत असल्याने ओलीत होत नाही. तर सोलर पंपाचे मेंन्टनंन्स डोकेदुखी ठरत असल्याने शिरजगांव मोझरी गावातील शेतकऱ्यांनी गाव बैठकीत राज्यपातळीवर जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने शुक्रवारी शासकीय विश्राम गृह तिवसा येथे २ वाजता शिरजगाव मोझरी येथील शेतकऱ्यांनी बैठकीचेआयोजन केले होते. ज्यामध्ये तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

गुरुवारी दुपारी २ वाजता तिवसा येथील पेट्रोल पंप चौकात शेतकऱ्यांना एकजूट होण्याचे आवाहन केले आहे. त्याठिकाणाहून शेतकऱ्यांचा जनआंदोलन मोर्चा तिवसा तहसील कार्यालय येथे जाऊन तहसीलदार यांच्यामार्फत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि ऊर्जामंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोलर सक्ती विरोध आणि शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी विद्युत कनेक्शन देण्याची मागणी करण्यात येणार आहे. यावेळी प्रमोद मेश्राम, महादेव अंबुलकर, प्रकाश मेश्राम, स्वप्नील निस्ताने, भूषण गाठे, प्रशांत कांबळे, देवेंद्र घाटोळ, विजय कुरळकर, पुरुषोत्तम मेश्राम, संदीप हगवणे, सुनील खाकसे, निलेश देवळे, पंकज वानखडे, मिलिंद खाकसे, चंद्रशेखर मेटांगे, हरिश्चंद्र नरखेडकर, शरद, धस्कट यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांची बैठकीमध्ये उपस्थिती होती.बॉक्स सोलर कंपन्या पोसण्यासाठी राज्य सरकारने गेल्या तीन वर्षांपासून सोलर सक्ती केल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. भविष्यात सरकार ज्या शेतकऱ्यांचे विद्युत कनेक्शन आहे. त्यांचे कनेक्शन सुद्धा बंद करून सोलर सक्ती करू शकते. त्यामुळे सरकारच्या सोलर सक्ती धोरणाच्या विरोधात जनआंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे. नेने करून सरकारने शेतकरी विरोधी धोरण बदलण्यात यावे. असे आवाहन प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते यांनी केले.

# बहिरम-कारंजा मार्गावर चार वाहनांचा भीषण अपघात; सुदैवाने जीवितहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९बहिरम**

अमरावती जिल्ह्यातील बहिरम-कारंजा मार्गावर आज चार वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातात सहभागी असलेले चालक किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.अपघातानंतर बहिरम-कारंजा मार्गावर सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले तसेच अपघाताचा पंचनामा केला.आज रविवार असल्याने महाराष्ट्राच्या विविध भागातून बहिरम येथे यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले होते. यात्रेकरूंच्या वाढलेल्या वर्दळीमुळे रस्त्यावर वाहतूक आधीच वाढलेली असताना हा अपघात झाल्याने काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक हळूहळू पूर्ववत केली.दरम्यान, अपघाताचे नेमके कारण तपासले जात असून वाहनचालकांनी गर्दीच्या काळात विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# आजपासून घुईखेड येथे संत बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चांदूर रेल्वे**

तालुक्यातील घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराज यांचे संजीवन समाधी सोहळ्याला १९ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. ३० जानेवारीपर्यंत हा महोत्सव चालणार आहे. याबाबतची माहिती संस्थानचे विश्वस्त प्रवीण घुईखेडकर यांनी पत्रकार परिषदेतून दिली. यावेळी नंदकिशोर काकडे, गजानन फिस्के, कैलास सावनकर यांची उपस्थिती होती.

२६ जानेवारीला काल्याचे कीर्तन, शोभायात्रा, दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. दहीहंडीचा कार्यक्रम होताच यात्रा महोत्सवाला सुरुवात होणार आहे. विदर्भातील एकमेव संजीवन समाधी श्री संत बॅडोजी महाराज यांनी घेतली होती. इ. स. १३३७ पासून बेंडोजी महाराजांचा संजीवन समाधी सोहळा सुरू आहे. या सोहळ्याचे यंदा ६८९ वे वर्ष आहे. २६ जानेवारी रोजी दुपारी ११ ते २ च्या दरम्यान हभप उमेश महाराज जाधव (आळंदीकर) यांचे काल्याचे कीर्तन होऊन कालावाटप होणार आहे. सायंकाळी ४ वाजता गोपाळकाला, दहीहंडी आणि सायंकाळी ७ वाजता महाप्रसादाचे आयोजन केले आहे. ३० जानेवारीला गोत आंबिल महाप्रसादाचे आयोजनही केले आहे. महोत्सवादरम्यान घुईखेडमध्ये करण्यात येणार आहे. लवकरच जंगी शंकरपटाचेही आयोजन घुईखेड येथे करण्यात येणार आहे.

# युवासेना शहरप्रमुखाचा पदाचा राजीनामा

## अंजनगाव सुर्जी स्वीकृत सदस्य निवडीत आर्थिक व्यवहाराचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अंजनगाव सुर्जी**

नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्य निवडीत वरिष्ठांकडून आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप करत शिवसेना (उबाठा) युवासेना शहर अध्यक्ष अक्षय गवळी यांनी १८ जानेवारी रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्थानिक विश्रामगृह येथे माध्यमांशी बोलताना त्यांनी ही अधिकृत घोषणा केली.

नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडल्यानंतर तब्बल २५ दिवसांनी अंजनगावमध्ये उपाध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, शिवसेना (उबाठा) कडे पुरेसे संख्याबळ असतानाही स्वपक्षाचा उमेदवार न निवडता उपाध्यक्षपदासाठी भाजपाला समर्थन देण्यात आले होते. या चर्चेनंतर आता स्वीकृत नगरसेवक निवडीतून नव्या वादाला तोंड फुटले आहे.

गवळी यांच्या मते, स्वीकृत नगरसेवक पदासाठी त्यांनी स्वतः (अक्षय गवळी), राजेंद्र टांक, राजेंद्र पाटील आणि पंकज मोदी यांनी अर्ज दाखल केले होते. पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी शब्द दिल्याने ते निश्चिंत होते. मात्र, ऐनवेळी नव्या नावाचा प्रस्ताव पुढे येत पंकज मोदी यांची निवड झाल्याचे गवळी यांचे म्हणणे आहे. या घडामोडीमुळे पक्षात प्रामाणिक कार्यकर्त्यांची किंमत शून्य झाली असून, या संपूर्ण प्रक्रियेत कुठेतरी आर्थिक व्यवहार झाला असावा, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली.

या घडामोडींनंतर शिवसेना (उबाठा) मध्ये मोठी गळती लागणार का, असा प्रश्न आता उघडपणे उपस्थित झाला आहे. पक्षातील अंतर्गत नाराजी चव्हाट्यावर आल्याने आगामी काळात याचे गंभीर राजकीय परिणाम भोगावे लागण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. अंजनगाव सुर्जीच्या स्थानिक राजकारणात नव्या वादळाचा स्पष्ट इशारा या घटनेतून मिळाला आहे.

या आरोपांवर युवासेना, शिवसेना (उबाठा) चे जिल्हाप्रमुख अंकुश कवाडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अक्षय गवळी यांना सलग चार वेळा युवा सेनेचे शहर अध्यक्षपद देऊन नगरपरिषद निवडणुकीत नगरसेवक पदाकरिता उमेदवारी सुद्धा दिली होती. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला असे म्हणता येणार नाही. त्यांनी राजीनामा देण्यापूर्वी श्रेष्ठींसोबत या विषयावर चर्चा करायला पाहिजे होती. आर्थिक व्यवहाराबाबतचा त्यांचा आरोप निखालस खोटा असून, आमच्या पक्षात असा कुठलाच प्रकार होत नाही.

# महाराष्ट्रात 'बुलडोझर राजकारण' चालणार नाही

## एक घर तोडाल तर १०० नेते निर्माण होतील; नागपूर दंगलीतील आरोपी फहीम खानचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

उत्तर प्रदेशातील 'बुलडोझर राजकारण' महाराष्ट्रात अजिबात चालणार नाही. तुम्ही एका फहीम खानला अटक केली, तर आज सहा नेते निवडून आले आहेत. बुलडोझरच्या माध्यमातून तुम्ही मुस्लिमांचे एक घर तोडाल, तर शंभर नेते निर्माण होतील, असा जळजळीत इशारा नागपूर दंगलीतील आरोपी फहीम खान याने दिला आहे. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत फहीम खानची पत्नी अलिशा खान हिने प्रभाग क्रमांक ३ मधून एमआयएमच्या तिकिटावर मोठा विजय मिळवला आहे.

१७ मार्च २०२५ रोजी नागपूरच्या महाल परिसरात भीषण दंगल उसळली होती. महालपासून अनेक किलोमीटर लांब राहत असूनही पोलिसांनी फहीम खानवर दंगलीचा कट रचल्याचा आरोप ठेवत गुन्हा दाखल केला होता. दंगलीनंतर महापालिकेने फहीम खानच्या कुटुंबीयांचे घर बेकायदेशीर ठरवत बुलडोझरने पाडून टाकले होते. सुमारे चार महिने तुरुंगात राहिल्यानंतर फहीम खान सध्या जामिनावर बाहेर आहे. नागपूर महानगरपालिका निवडणुकीत फहीम खानच्या पत्नीसह -खचखच् चे एकूण सहा नगरसेवक निवडून आले आहे. या पार्श्वभूमीवर एका वृत्तवाहिनीशी बोलताना फहीम खान याने नाव न घेता भाजपला उपरोक्त इशारा दिला आहे.

### नेमके काय म्हणाला फहीम खान?

उत्तर प्रदेशातील 'बुलडोझर राजकारण' महाराष्ट्रात अजिबात चालणार नाही. तुम्ही एका फहीम खानला अटक केली, तर आज सहा नेते निवडून आले आहेत. बुलडोझरच्या माध्यमातून तुम्ही मुस्लिमांचे एक घर तोडाल, तर शंभर नेते निर्माण होतील. त्यामुळे बुलडोझरच्या माध्यमातून तुम्ही न्याय करण्याचा प्रयत्न कराल, एक घर तोडाल, तर तुम्ही मुस्लिमांमध्ये १०० नेते निर्माण कराल, असे फहीम खान म्हणाल

आणखी एका फहीमला चुकीच्या पद्धतीने अटक कराल, तर आज फक्त दोन प्रभागातून हद्दपार झालेला तुमचा पक्ष उद्या संपूर्ण शहरातून साफ होईल, असा इशारा फहीम खान याने भाजपचे नाव न घेता दिला. आता पत्नीच्या महापालिका निवडणुकीतील विजयानंतर पालिकेने पाडलेले तेच घर पुन्हा उभारणार असल्याचे फहीम खान याने सांगितले. नागपूरच्या राजकारणात फहीम खानच्या या वक्तव्यामुळे आता नवे वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे.


# रतन इंडियाच्या 'व्यवसायविरोधी' धोरणाविरोधात आजपासून ठिय्या आंदोलन

## अंबाई ब्रिक्स, ट्रान्सपोर्ट असो व चालक मालकांच्या वतीने बेमुदत वाहतूक बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नांदगाव पेठ**

भारत सरकारच्या शासन निर्णयाला हरताळ फासून लघु व सूक्ष्म उद्योजकांची आर्थिक पिळवणूक करणार्या रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाच्या धोरणाविरोधात ट्रक चालक-मालक व स्थानिक व्यावसायिक आक्रमक झाले असून आजपासून (दि.१९) रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.अंबाई ब्रिक्स, ट्रान्सपोर्ट असो व चालक मालकांच्या वतीने आजपासून बेमुदत वाहतूक बंद पुकारण्यात आला असून मागण्या पूर्ण होईपर्यंत एकही वाहन येथून राख भरून जाणार नसल्याचा इशारा संतप्त चालक व मालकांनी दिला आहे. रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पामधून निर्माण होणारी राख ही भारत सरकारच्या विद्युत मंत्रालय, श्रमशक्ती भवन, नवी दिल्ली यांच्या १५ एप्रिल २०२४ च्या शासन निर्णयानुसार लघु व सूक्ष्म उद्योजकांना केवळ एक रुपया प्रति टन दराने देणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात मात्र रतन इंडिया व राख वितरण करणार्या संबंधित कंपनीकडून पन्नास पटीने अधिक दर आकारले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे स्थानिक ब्रिक्स उद्योग, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक तसेच ट्रक चालक-मालकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट सुरू असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. अंबाई लोकल ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशन यांच्या वतीने अध्यक्ष बलविर चव्हाण यांनी स्पष्ट केले की, भारत सरकारच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता व्यावसायिकांची दिशाभूल केली जात आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही रतन इंडिया व्यवस्थापनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने आता आमरण ठिय्या आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही, असा इशारा त्यांनी दिला.या आंदोलनाला राजु चिरडे, मोरेश्वर इंगळे, राम चंदेल, सुरज भैस, उमेश डोईफोडे, धीरज चव्हाण, अजय मोरवाल, सचिन कापडे, सागर अंबाडकर, अंकुश झगडे, किशोर चंद्रकर, विशाल देशमुख, चंदन मोरे यांच्यासह सर्व ट्रक चालक-मालक व स्थानिक व्यावसायिकांचा पाठिंबा आहे.दरम्यान, शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून एक रुपया प्रति टन प्रमाणे राख उपलब्ध करून न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# संजय राऊतांची आजारपणामुळे बुद्धी भ्रष्ट - प्रकाश महाजनांची टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक युद्ध पेटले आहे. शिंदे गट आणि भाजपचे नगरसेवक कैदखान्यात आहेत, या संजय राऊतांच्या टीकेला शिवसेना (शिंदे गट) प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी अत्यंत जळजळीत भाषेत प्रत्युत्तर दिले आहे. मुंबई महापालिका हातातून गेल्यामुळे आता 'मातोश्री-२'चा खर्च कसा चालवायचा, ही चिंता ठाकरेंना सतावत आहे. अशा शब्दांत महाजनांनी ठाकरेंच्या आर्थिक नाड्या आवळल्या गेल्याचा टोला लगावला.

संजय राऊत यांनी उपस्थित केलेल्या 'कैदखाना' आणि 'नगरसेवक फोडाफोडी'च्या आरोपांचा समाचार घेताना प्रकाश महाजन म्हणाले की, संजय राऊत यांची आजारपणामुळे बुद्धी भ्रष्ट झाली आहे. निवडणुकीच्या काळात सर्व नगरसेवकांनी जीवाचे रान केले आहे, त्यामुळे त्यांना एकत्र ठेवले आहे. शिवसेनेचा (शिंदे गट) एकही नगरसेवक फुटणार नाही, उलट ठाकरेंचेच नगरसेवक आमच्या संपर्कात असून ते फुटण्याची दाट शक्यता आहे.

### २०१९ च्या 'दगाफटक्या'ची आठवण

भाजप आणि शिंदे गटात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप फेटाळताना महाजन यांनी उद्धव ठाकरेंच्या भूतकाळातील निर्णयांवर निशाणा साधला. आम्ही युतीमध्ये निवडणुका लढलो आहोत आणि आम्ही शब्दाचे पक्के आहोत. २०१९ मध्ये ज्याप्रमाणे ठाकरेंनी सोबत लढून निकालानंतर दगाफटका केला, तसे आम्ही करत नाही. फडणवीस आणि शिंदे हे दोघे मिळून राज्याच्या आणि युतीच्या हिताचाच निर्णय घेतील, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# अमरावतीत सत्तासंघर्ष तीव्र बसपा ठरवणार महापौर कोणाचा ?

## सत्तेसाठी अडीच वर्षांचे उपमहापौरपद व स्थायी समिती सभापतीपदाची अट




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ११ रुक्मिणीनगर–फ्रेजरपुरा येथील तिन्ही जागांवर विजय मिळवत बहुजन समाज पार्टीने (बसपा) आपली ताकद सिद्ध केली असून सध्या मनपात बसपा निर्णायक म्हणजेच 'किंगमेकर'च्या भूमिकेत आली आहे. वाढलेल्या राजकीय महत्त्वाची जाणीव ठेवत बसपाने सत्तेत सहभागी होण्यासाठी स्पष्ट आणि ठोस अटी समोर ठेवल्या आहेत. अडीच वर्षांच्या कार्यकाळासाठी उपमहापौरपद तसेच एका पूर्ण कार्यकाळासाठी स्थायी समितीचे सभापतीपद देण्यात यावे, अशी मागणी बसपाकडून करण्यात आली आहे.नुकत्याच जाहीर झालेल्या निवडणूक निकालांवरून स्पष्ट होते की, बसपाला सोबत घेतल्याशिवाय कोणत्याही पक्षाला अमरावती मनपात सत्ता स्थापन करणे शक्य नाही. ८७ सदस्यीय महापालिकेत बहुमतासाठी ४४ नगरसेवकांचे संख्याबळ आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर २५ जागा मिळवलेल्या भाजपाबरोबरच काँग्रेस, युवा स्वाभिमान पक्षानेही बसपाच्या स्थानिक नेतृत्वाशी संपर्क साधून पाठिंब्याची मागणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) जर स्थानिक पातळीवर राष्ट्रवादी आणि काँग्रेसजवळ गेली, तर दुसरे सत्ता–समीकरण उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, भाजपाच्या सत्तास्थापनेच्या स्वप्नांना युवा स्वाभिमान पक्षाने मोठा धक्का दिल्याचे चित्र आहे. 'मोठा भाऊ' म्हणत भाजपच्या पाठीत खंजीर खुपसल्याची दबक्या आवाजातील चर्चा सुरू असून, भाजप महापौरपदाच्या प्रश्नावर नेमका कोणता तोडगा काढतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डॉ.सुनील देशमुख म्हणतात महापौर तर आमचाच बसणार

## समविचारी पक्षांना सोबत घेऊन तयारी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नस्ल्याने सत्तास्थापनेवरून संघर्षाची चिन्हे आहेत. भाजपने सर्वाधिक २५ जागा जिंकल्या असल्या तरी महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपला युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट या महायुतीतील घटक पक्षांची मदत घ्यावी लागणार आहे. पण, या युवा स्वाभिमान पश्न सोबत असेल, तर आम्ही भाजपला मदत करणार नाही, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय खोडके यांनी जाहिर केल्याने वेगळाच पेच निर्माण झाला आहे. त्यातच आता काँग्रेसनेही सत्ता स्थापन कराणासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

काँग्रेसचे नेते आणि माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख म्हणाले, गेल्या निवडणुकीत भाजपला ४५ जागा मिळाल्या होत्या, यावेळी त्यांना तब्बल २० जागा कमी मिळाल्या आहेत. भाजपचा जनाधार घटलेला आहे. मतदारांनी त्यांना नाकारले आहे, तरी देखील भाजपला सत्तेची हाव असल्याने त्यानी सत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. वास्तविक जनादेश स्वीकारून भाजपने विरोधी पक्षात बसायला



हवे. काँग्रेसनेही महापौरपदाच्या निवडणुकीसाठी समविचारी पक्षांना सोबत घेऊन मोट बांधण्यचा प्रयत्न सुरू केला आहे.आधी महाविकास आघाडीतील घटक पक्षांसोबत आम्ही वर्चा करू. त्यानंतर सत्ता स्थापन करण्यासाठी कुणाची मदत घ्यायची, याविषयी निर्णय घेतला जाईल. कुठल्याही परिस्थितीत जातीयवादी पक्षाला आम्ही सोबत घेणार नाही.काँग्रेसला त्याची गरज ही नाही शिवसेना उद्धव ठाकरे गट,वंचित बहुजन आघाडी सोबत आम्ही बोलणी सुरू केली आहे.बसपसोबतही चर्चा केली जाईल. आम्ही समविचारी पक्ष मिळून सत्ता स्थापन करण्याचा आणि अमरावतीच्या विकासाला चालना देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करू.डॉ. सुनील देशमुख म्हणाले, या निवडणुकीत पैशांचा अमाप वापर झाला. भाजपने धनसपत्ती, साधनसंपत्तीचा वापर केला. जिल्ह्यातील आमदार हे प्रत्येक प्रभागात येऊन नियोजन करीत होते, पालकमंत्री स्वतः लक्ष ठेवून होते. पण, अमरावतीकर हे गेल्या आठ वर्षांतील भाजपच्याकारभाराला कंटाळले होते. त्यामुळेच भाजपची ४५ वरून २५ वर घसरण झाली आहे. त्या तुलनेत काँग्रेसकडे आर्थिक पाठबळ नव्हते. तरीही काँग्रेसने चांगली कामगिरी केली. काँग्रेसचे १५ उमेदवार निवडून आले. मुस्लीमबहुल भागात काँग्रेला अपेक्षित मते मिळू शकलीं नाही. या ठिकाणी काँग्रेसपेक्षा एमआयएमला अधिक जागा मिळाल्या. या भागातून थोडी साथ मिळाली असती, तर काँग्रेसच्या सहा ते सात जागा निश्चितपणे वाढल्या असत्या.

# पेढा की जिलेबी? 'खबर' देणाऱ्या किती जणांना एक लाखांचे बक्षिस ?

## बेकायदेशीर गर्भलिंग निदान करू नका करणाऱ्यांवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

प्रसूतीपूर्व निदान तंत्राचा वापर करून बेकायदेशीररीत्या गर्भलिंग निदान करणे, गर्भपात करणे शिक्षेस पात्र आहे. परंतु, त्यानंतरही लपून–छपून गर्भलिंग निदान आणि गर्भपात करण्यात येत आहे. यासंदर्भात आता शासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बेकायदेशीर गर्भलिंग निदानाची माहिती देणाऱ्यास एक लाख रुपये बक्षीस देण्यात येणार असून, गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

समाजात अजूनही भ्रूण हत्या करणाऱ्या अमानवी प्रवृत्तीची कमी नाही. मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत कमी होत आहे. परंतु, त्यानंतर सोनोग्राफी केंद्रात गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ चे उल्लंघन करण्यात येत आहे. त्यामुळे असे कृत्य करण्याची जाहिरात करणाऱ्या व्यक्ती, पुस्तके, प्रकाशने, संपादक, वितरक आदींची माहिती आरोग्य विभागाच्या टोल फ्री क्र. १८०० २३३ ४४७५ या



क्रमांकावर नागरिकांनी नोंदवावी. या बाबीची खातरजमा झाल्यावर संबंधित सोनोग्राफी केंद्रावर, व्यक्तीवर न्यायालयीने प्रकरण दाखल केल्यावर माहिती देणाऱ्या व्यक्तीस एक लाख रुपये इतकी रक्कम बक्षीस म्हणून शासनातर्फे जाहीर करण्यात आली आहे

**कोडवर्ड; पेढा की जिलेबी ?**

पोटातील गर्भाचे लिंग जाणून घेणे आणि जर ती मुलगी असेल, तर गर्भपात करणे म्हणजे गर्भलिंग निवड आहे. गर्भात मुलगा असल्यास 'पेढा' आणि मुलगी असल्यास जिलेबी', असे कोडवर्ड त्यासाठी वापरण्यात येतात. तसेच काही वेळा प्री–स्क्रिप्शनवर विशिष्ट अशी खूण केली जाते. लपून–छपून हे प्रकार सर्रासपणे केले जातात. त्यावर आता शासनाने करडी नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे.

# महापालिका निवडणुकीनंतरही हप्ता न मिळाल्याने अमरावतीत 'लाडक्या बहिणी' आक्रमक

## जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

महापालिकेची निवडणूक संपून बराच काळ लोटला तरी 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता खात्यात जमा न झाल्याने अमरावतीत महिलांचा संताप उफाळून आला. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेकडो लाडक्या बहिणींनी भव्य मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले. तात्काळ थकीत हप्ता देण्यात यावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.मोर्चात सहभागी झालेल्या महिलांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले. ई–केवायसीसाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. अवघ्या आठ दिवसांत ई–केवायसीची वेबसाईट बंद करण्यात आल्याने अनेक महिलांना नोंदणी करता आली नाही, असा आरोप आंदोलकांनी केला. तसेच काही प्रकरणांमध्ये ई–केवायसी करताना चुकीची माहिती भरली गेल्यामुळे जिल्ह्यातील हजारो लाडक्या बहिणी अपात्र ठरल्याचेही महिलांचे म्हणणे आहे.या अन्यायकारक कारवाईविरोधात महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत पुन्हा ई–केवायसी करण्याची संधी द्यावी आणि थकीत रक्कम तात्काळ खात्यात जमा करावी, अशी मागणी लावून धरली. खात्यात पैसे जमा न झाल्याने अनेक महिलांवर आर्थिक संकट ओढावल्याचे यावेळी सांगण्यात आले.दरम्यान, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा देत लाडक्या बहिणींनी उपजिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले. परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने चर्चेचे आश्वासन दिले असले तरी ठोस निर्णयाची प्रतीक्षा महिलांकडून व्यक्त केली जात आहे.

# राज्यात दोनच विभाग कॉपीमुक्त, उर्वरित कॉपीयुक्त

## बारावीची ७६ व दहावीची ३१ परीक्षा केंद्रे गैरप्रकार झाल्याने यावर्षी बंद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

राज्य शिक्षण मंडळातर्फे दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी विशेष अभियान सूरू करण्यात येत आहे. कारण गतवर्षी कठोर बंदोबस्त करूनही सरसकट काही परीक्षा केंद्रावर कॉपी प्रकरणे गाजली. म्हणून अशी वाईट कारणांनी गाजलेली केंद्रे यावर्षी बंद करण्यात आली आहे. या ठिकाणी होणाऱ्या परीक्षा यावर्षी अन्य केंद्रावर घेतल्या जाणार आहे. मंडळाने तसे लेखीच सूचित केले.गतवर्षी कॉपीमुक्त अभियान राबवूनही कॉप्या चालल्याने राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अशी केंद्रे बंद केली. त्यात कोल्हापूर व कोकण या दोनच विभागातील एकही परीक्षा केंद्रावर कॉपी चालली नाही. उर्वरित पूणे, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, मुंबई, नाशिक व लातूर या विभागातील जिल्ह्यातल्या केंद्रावर कॉप्या सापडल्या होत्या. म्हणून या विभागातील बारावीची ७६ व दहावीची ३१ परीक्षा केंद्रे गैरप्रकार झाल्याने यावर्षी बंद करण्यात आल्याचे मंडळाने जाहीर केले आहे.यावर्षी फेब्रुवारी – मार्च महिन्यात होणाऱ्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी विशेष योजना आखण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रावर निगराणी ठेवण्यासाठी संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत दक्षता समिती राहणार असून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना परीक्षा केंद्रास भेटी देण्याची विनंती शिक्षण विभाग करणार. १९ ते २६ जानेवारी दरम्यान जनजागृती सप्ताह आयोजित करून स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक यांच्या सहभागसह कॉपीमुक्त अभियान पुरुस्कृत होईल.जिल्हा दक्षता समिती परीक्षेच्या एक दिवस आधी केंद्रवरील सुविधाची तपासणी करणार, उपद्रवी व संवेदनशील केंद्र परिसरात सिसिटीव्ही यंत्रणा असल्याची खात्री करायची आहे. मोठ्या परीक्षा केंद्रवर प्रश्नपत्रिका नेणे व उत्तरपत्रिका गोळा करण्यासाठी गरजेनुसार शासकीय वाहने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांच्यां दक्षता समितीवर आहे. या वाहनासोबत पोलीस कर्मचारी असावा. उपद्रवी व संवेदनशील परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी ठेवावी. केंद्राबाहेर व्हिडिओ चित्रीकरण करण्याची व्यवस्था ठेवायची आहे. गैरप्रकारस उदयुक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग अवलंब करणारे, यांच्यावर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची कारवाई नमूद करण्यात आली आहे. केंद्रापासून ५०० मिटर परिसरात असणारे झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्याचे निर्देश आहेत. केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक उपाय लागू होतील.

# हॉटेलात बिलावर 'सर्व्हिस चार्ज' आकारल्यास तक्रार कुठे कराल?

## तक्रार करा अन् धडा शिकवा : हॉटेलातील सेवा शुल्क पूर्णपणे ऐच्छिक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

वीकेंड किंवा सुट्टीच्या दिवशीआपण कुटुंब किंवा मित्रांसोबत बाहेर जेवण्याचा प्लॅन करता. अनेक रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्स सुद्धा तुमच्या खाण्याच्या (फूड) बिलामध्ये सर्व्हिस चार्ज जोडतात. तुमच्यासोबतही असे घडत असेल, तर त्याचा निषेध करा.



ग्राहक कायदा ग्राहकांना सेवा शुल्काविरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार देतो. सेवा शुल्काबाबत हॉटेल्स–रेस्टॉरंट आणि ग्राहकांमध्ये वाद झाल्याचे गेल्या काही वर्षात पाहायला मिळाले आहे. तुम्ही तुमचे कुटुंब किंवा मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये जाता आणि जेवण झाल्यावर मालक तुमच्या फूड बिलात सर्व्हिस चार्ज (सेवा शुल्क) जोडतात. अशा परिस्थितीत, ग्राहकाला त्याचे पैसे वाचवण्याचे काही अधिकार असतात. हॉटेलवाले अनेकदा सर्व्हिस चार्जच्या नावाखाली जास्त पैसे आकारतात, जे नियमानुसार पूर्णपणे चुकीचे आहे. तुमच्या सोबतही असा काही प्रकार घडला असेल किंवा भविष्यात तुमच्यासोबत असे घडू नये, यासाठी ग्राहक चार प्रकारे तक्रार करू शकतात.

इतर नावाने किंवा छुप्या शुल्कावरही बंदी(बोल्ड मध्ये)ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना बिलामध्ये 'सर्व्हिस चार्ज' (सेवा शुल्क) स्वयंचलितपणे लावण्यास, इतर नावांनी लपवून शुल्क आकारण्यास किंवा ग्राहकांना ते भरण्यास भाग पाडण्यास सक्त मनाई केली आहे. हे शुल्क पूर्णपणे ऐच्छिक असून, ते न भरल्यास सेवा नाकारता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश आहेत आणि या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. यात दंड आणि शुल्क परत करण्याच्या सक्तीचा समावेश आहे.

**कुठे करता येईल याबाबत तक्रार**

रेस्टॉरंट किंवा हॉटेल मालक–व्यवस्थापक तुमचे ऐकत नसल्यास तुम्ही नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाइनवर तक्रार नोंदवू शकता. येथे सुरुवातीलाच वाद मिटवण्याची व्यवस्था असून, तुम्ही हेल्पलाइन नंबर १९१५ वर कॉल करून किंवा एनसीएच ॲपद्वारे तक्रार नोंदवू शकता. याशिवाय ग्राहक याबाबत कन्झ्युमर आयोगाकडे तक्रारही करू शकतो. ई–फायलिंग पोर्टलवरही ऑनलाइन तक्रार करता येते.

# आता जि. प. मध्येही वॉर रुम सर्व अधिकाऱ्यांशी संवाद सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर आता जिल्हा परिषदेतही 'वॉर रूम' उघडण्यात आली आहे. या वॉर रूम च्या माध्यमातून जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व प्रमुख अधिकारी आणि पंचायत समिती स्तरावर कार्यरत बीडीओंना एकमेकांशी जोडण्यात आले असून, त्यांच्याशी संवादाची देवाण–घेवाण सुरूझाली आहे.




एखाद्या महत्वाच्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याची वेळ आली किंवा एखादी सूचना एकाचवेळी सर्वांपर्यंत पोहोचवण्याची वेळ उद्भवली की पूर्वी फोन कॉल अथवा मेलचा वापर केला जायचा. आता वॉर रूम तयार झाल्याने अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधणे शक्य झाले असून, हवी ती उपाययोजना त्वरेने अंमलात आणणे शक्य झाले आहे.मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान जिल्हास्तरीय वार रुम सीईओ यांच्यासह जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विविध विभागांचे डेप्युटी सीईओ या वॉर रुमचा उपयोग करीत असून, त्यामुळे प्रशासनाला अधिक दक्ष व लोकांप्रती उत्तरदायी केले जात आहे. जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांच्या संकल्पनेतून ही वॉर रूम सुरू झाली असून, त्यांच्याच हस्ते या वॉर रुमचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, अमरावतीचे गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे आदी अधिकारी उपस्थित होते. दरम्यान अशाच वॉर रुम तालुका पातळीवर अर्थातच पंचायत समिती मुख्यालयी स्थापन केल्या असून, त्या 'वॉर रुम'शी तालुक्यातील शाळा, दवाखाने, ग्रामपंचायतींना जोडले आहे.

**गंभीर प्रकरणांचा त्वरेने निपटारा**

पावसाळ्याच्या दिवसांत बऱ्याचदा पाणी पुरवठ्यात अडचणी निर्माण होतात. आजारही फैलावतात. अशावेळी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असते. दवाखान्यांमध्ये औषींचा तुटवडा, डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, घरकुल आणि इतर मुद्दधांवरुन कधी–कधी निर्माण होणारे किरकोळ वाद यावर तातडीने निर्णय घेण्यासाठी या वॉर रुमचा उपयोग होत असल्याचे अधिकाऱ्यांचे निरीक्षण आहे.

# शंकर पटाच्या कारभाऱ्यांचे हात वर; पत्रकारांच्या प्रश्नांवर आयोजक निरुत्तर

## भुरट्या पत्रकारांच्या बातम्यांशी संबंध नसल्याची कबुली : पत्रकार संघटनेकडून कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील तळेगाव दशासर येथील शंकर पटात पत्रकारांच्या प्रश्नावर कृषक सुधार मंडळ रविवारी (ता.१८) निरुत्तर ठरले.दरम्यान पत्रकारांच्या गळचेपी व दडपशाहीवर मंडळाने हात वर केले आहे.त्या भुरट्या पत्रकारांशी व निषेध व्यक्त करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी आमचा संबंध नाही असे अस्थिर उत्तरे यावेळी उपस्थित पत्रकारांना देण्यात आली.




शंकर पटातील अव्यवस्था व संशयित अर्थकारणाच्या बातम्या प्रसार माध्यमांकडून चव्हाट्यावर आल्या आहेत.माध्यमांवर संबंधीत बातम्यां प्रकाशित होताच कृषक सुधार मंडळात आर्थिक गैरव्यवहाराचा संशय व्यक्त केला जात होता.अर्थार्जनाच्या गंभीर बाबी चव्हाट्यावर येऊ नये यासाठी बातम्यांचे सत्य दडपण्याच्या प्रयत्नात एका भुरट्या पत्रकाराला हाताशी धरून तळेगाव दशासर शंकर पटात काहींनी माध्यमांवर आलेल्या बातम्या चुकीच्या ठरविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला होता.वास्तविकतेवर पांघरून घालण्यासाठी पत्रकारांवर दबावतंत्र वापरून सत्य झाकण्याचा आटोकाट प्रयत्न कृषक सुधार मंडळाने केला होता.मात्र पत्रकारांनी सदर बाब संघटनेच्या निदर्शनास आणून दिली असता पत्रकार संघटनेच्या वतीने तळेगाव दशासर कृषक सुधार मंडळाला भेट देण्यात आली.यावेळी आम्ही पत्रकरांचा कोणताही निषेध केलेला नाही व निषेध नोंदवणाऱ्या कुणाशीही आमचा संबंध नाही व त्या भुरट्या पत्रकाराला आम्ही ओळखत सुद्धा नाही इत्यादी अस्थिर उत्तरे देण्यात आली.यावेळी सदरचे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने धामणगाव पत्रकार संघटनेच्या वतीने निषेध करण्यात आला.संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून पत्रकारांवर दबाव आणून स्वत:चे उखळ पांढरे करणाऱ्या कृषक सुधार मंडळाच्या चौकशीची मागणी जिल्हाधिकारी व संबंधित विभागाला करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी मराठी पत्रकार संघटनेचे सचिव मंगेश भुजबळ यांनी दिली आहे. सदर प्रकरणात पत्रकारांच्या अभिव्यक्तीवर गदा आणणाऱ्यावर फौजदारी कारवाईची तक्रार तळेगाव पोलिसात करण्यात आली आहे.एकंदरीत संपूर्ण प्रकरणात कृषक सुधार मंडळाचे अर्थकारण दडले असल्याच्या बातम्यांची सत्यताच समोर आली असून चौकशीतून मोठे खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**अन् म्हणे आमदारांना श्रेय का द्यायचे.**

पत्रकारांनी अर्थकारणाच्या मुद्द्यावर बोट ठेवताच कृषक सुधार मंडळाने उडवाउडवीची व जनतेची दिशाभूल करणारी उत्तरे देऊन टाळाटाळ केली.घटनेत पोलीस व पट कमिटी यांच्या वादात समन्वय साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न आमदार प्रताप अडसड यांनी केला होता मात्र आमदाराला श्रेय का द्यायचे हा विषय डॉ. देशमुख यांनी जाणीवपूर्वक समोर आणल्याने या प्रकरणी राजकीय चढाओढीत शंकरपट गुरफटला असल्याचे सुद्धा दिसून आले.

सदर सपूर्ण प्रकरणाचा निषेध करताना यावेळी मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पवन शर्मा सचिव मंगेश भुजबळ, बोधिसत्व काळे, वरिष्ठ पत्रकार हाफिज भाई, युवा पत्रकार संघटनेचे सचिव सुरज वानखडे, सदस्य हितेश गोरिया, पवन बहाळ, सलमान खान गजानन फिरके उपस्थित होते.

# संत्र्याला ७२ हजार रुपये प्रति टन दरसंत्रा उत्पादकांना मिळाला दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९वरुड**

मृगबहारातील संत्र्यांची कळमना बाजारात रोज सरासरी ४० क्विंटलची आवक होत आहे. दरम्यान, खरेदीदारांची मागणी आणि उपलब्धता यामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे. परिणामी, चांगल्या प्रतीच्या संत्र्यांना ७२ हजार रुपये आणि सामान्य दर्जाच्या संत्र्यांना ५२ हजार रुपये प्रति टन असा दर मिळत आहे.



महत्त्वाचे म्हणजे, बाजारात ज्या प्रमाणात खरेदीदार आहेत, त्या तुलनेत फळांचा पुरवठा अत्यंत मर्यादित आहे. त्यामुळे वरुड, मोर्शी, अचलपूर तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. संत्र्यांला केरळसह दक्षिण भारतातून मागणी वाढली आहे. त्यामुळे सध्या दर तेजीत असल्याचे नव अनंत शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक राकेश मानकर यांनी सांगितले. फळांचा लॉट बाजारात उतरता क्षणी बोली लागत आहे. संत्रा बाजारात दर कमी होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नव्या आवकेची गरज असते; मात्र सध्या ती परिस्थितीच नाही. त्यामुळे बाजारात 'ओव्हर सप्लाय' होण्याची शक्यता नसल्याने भाव दबावाखाली येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही व्यापारी सूत्रांकडून वातावरणातील बदलामुळे यंदा सुरुवातीच्या काळात मृग बहार गळाला होता. त्यानंतर काही शेतकऱ्यांनी व्यवस्थापनाच्या बळावर दुसऱ्यांदा हा बहार घेण्यात यश मिळविले. अशाच शेतकऱ्यांच्या बागांमधील फळांची आवक बाजारात होत आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत